# स्पंदन

२९-२००१




दूधसाखर महाविद्यालय, बिद्री
( ता. कागल, जि. कोल्हापूर)

# दूध साखर महाविद्यालय, बिद्री



निसर्गरम्य परिसरात महाविद्यालयाची भव्य इमारत



मा. प्राचार्य समवेत संपादक मंडळ

प्रा. धनंजय दिघे, प्रा. मोहनसिंग टाकळे, प्रा. राजेंद्र चोपडे, प्राचार्य शिवाजीराव पाटील,
प्रा. चिंतामणी जाधव, प्रा. राजाराम पाटील व प्रा. आनंद वारके

श्री. दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ बिद्री (मौनीनगर) संचलित

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

# ॥ स्पंदन ॥

वार्षिक अंक सातवा

१९९९–२०००

**संपादक मंडळ**

| | |
|---|---|
| प्राचार्य शिवाजीराव पाटील | अध्यक्ष |
| प्रा. राजेंद्र चोपडे | कार्यकारी संपादक |

**विभागीय मंडळ**

| | |
|---|---|
| प्रा. आनंद वारके | मराठी |
| प्रा. धनंजय दिघे | हिंदी |
| प्रा. चिंतामणी जाधव | इंग्रजी |
| प्रा. राजाराम पाटील | शास्त्र |

**मुखपृष्ठ संकल्पना**

प्रा. मानसिंग टाकळे

प्रा. नंदू पाटील

दि प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट नियम ८ , फॉर्म नं. ४ प्रमाणे
आवश्यक असलेली माहिती

# ॥ स्पंदन ॥

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | : | दूधसाखर महाविद्यालय, बिद्री |
| प्रकाशन काळ | : | वार्षिक |
| प्रकाशकाचे नाव | : | मा. प्राचार्य शिवाजीराव पाटील |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | दूंधसाखर महाविद्यालय, बिद्री |
| संपादक | : | प्रा. राजेंद्र चोपडे |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | दूधसाखर महाविद्यालय, बिद्री |
| मुद्रकाचे नांव | : | श्री. सदाशिवराव साबळे |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | मु. पो. क ॥ तारळे ता. राधानगरी |

मी प्राचार्य शिवाजीराव पाटील जाहीर करतो की वरील माहिती माझ्या समजुतीप्रमाणे वरोवर आहे.

शिवाजीराव पाटील

प्राचार्य

या अंकातील लेखकांच्या मताशी प्रकाशक व संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

(फक्त खाजगी वितरणासाठी)

श्री. दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ बिद्री (मौनीनगर) संचलित

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

# भावपूर्ण



# श्रध्दांजली

'स्पंदन' साहित्य अंक प्रसिध्दी काळात जागतिक कीर्तीच्या, भारतीय उपखंडातील, महाराष्ट्रातील, शैक्षणिक, साहित्य, कला व क्रीडा क्षेत्रातीलथोर व्यक्ती, संस्थेवर प्रेम करणाऱ्या ज्ञात-अज्ञात व्यक्ती, नैसर्गिक उत्पात, अपघात इत्यादीमुळे प्राण गमावलेल्या कुंटुबियांच्या दु:खात आम्ही सहभागी असून त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करुन आम्ही

भावपूर्ण श्रध्दांजली

अर्पण करीत आहोत !

स्पंदन ९९-२०००

# कारगील भूमीस शतशः प्रणाम

आमच्या भारतीय
जवानांच्या निर्भीड, शूर
रक्ताच्या सड्यास व
अमर जवानांच्या पवित्र
स्मृतीस ११-२०००
स्पंदनचा

**शतशः प्रणाम !**

# भावपूर्ण श्रध्दांजली



कै. विश्वनाथ (आण्णा) हरीभाऊ पाटील

माजी चेअरमन- दूधगंगा वेदगंगा सह. साखर कारखाना लि. बिद्री
शेतकरी सहकारी संघ लि. कोल्हापूर

# भावपूर्ण श्रध्दांजली



वेदशास्त्रसंपन्न कै. कृष्णमकाका



क. रवींद्र श्रीपती पाटील



कै. अरुण पाटील

# संस्थेचे आधारस्तंभ



**मा. दिनकररावजी भाऊसो जाधव**

अध्यक्ष

श्री. दूधगंगा वेदगंगा शिक्षण प्रसारक मंडळ लि. बिद्री.

श्री. दूधगंगा वेदगंगा सह. साखर कारखाना लि. बिद्री.

# संस्थेचे आधारस्तंभ



**मा. विजयसिंह कृष्णाजी मोरे**

उपाध्यक्ष

श्री. दूधगंगा वेदगंगा शिक्षण प्रसारक मंडळ लि. बिद्री.

श्री. दूधगंगा वेदगंगा सह. साखर कारखाना लि. बिद्री.



संस्था मार्गदर्शक

## मा. नामदेवराव भोईटे

(माजी आमदार - राधानगरी- भुदरगड)



## मा. के. डी. गोसावीसो

मानद सचिव- श्री. दूधगंगा वेदगंगा शिक्षण प्रसारक मंडळ लि. बिद्री.
कार्यकारी संचालक -श्री. दूधगंगा वेदगंगा सह. साखर कारखाना लि. बिद्री.



महाविद्यालयाचे प्राचार्य

## मा. शिवाजीराव पाटील

श्री. दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि. बिद्री

# मान्यवर संचालक मंडळ



मा. नंदकुमार सुर्यवंशी
(पनोरी)



मा. मारुतीराव फराकटे
(क॥ वाळवे)



मा. दिनकर आवदार
(तिटवे)



मा. बाबासाहेब पाटील
(वाळवे खुर्द)



मा. प्रविणसिंह पाटील
(मुरगुड)



मा. बापूसाहेब भोसले
(चिखली)



मा. सुरेशराव सुर्यवंशी
(निढोरी)



मा. प्रकाशराव देसाई
(सोनाळी)



मा. दत्तात्रय उगले
(मडिलगे बु॥)

## श्री. दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि. बिद्री

# मान्यवर संचालक मंडळ



मा. धनाजी देसाई
(कडगाव)



मा. कृष्णात पाटील
(वडकशिवाले)



मा. दिनकर कांबळे
(आदमापूर)



मा. पंडीत केणे
(गंगापूर)



मा. मारुतराव सावडकर
(आणूर)



मा.बा. शं. पाटील
(कामगार प्रतिनिधी)



मा. यशवंत पाटील
(कामगार प्रतिनिधी)



मा. सौ. लिला दि. पाटील
(अर्जुनवाडा)



मा. सौ. गिता के. चौगले
(पनोरी)

# विद्यार्थी संसद ९९-२०००



कुमार चौगले
बी. ए.-२
विद्यापीठ सचिव व क्रीडा प्रति.



कु. शकुंतला पाटील
बी. ए.-१
वर्ग प्रतिनिधी



कु. एस. टी. योडके
बी. एस्सी.-१
वर्ग प्रतिनिधी



हिमतसिंह पाटील
बी. एस्सी.-२
वर्ग प्रतिनिधी



कु. वीणा मंत्री
बी. एस्सी.-३
वर्ग प्रतिनिधी



युवराज फराकटे
एन. एस. एस. प्रतिनिधी



वीरकुमार पाटील
सांस्कृतिक प्रतिनिधी



कु. स्मिता संकपाळ
विद्यार्थीनी प्रतिनिधी



कु. पी. एम. खांवे
विद्यार्थीनी प्रतिनिधी

# विद्यार्थी संसद ९८-९९

कु. सविता पाटील
विद्यापीठ सचिव



कु. कविता तवंद
बी एस्सी. २



कु. सारिका पाटील
बी. एस्सी. ३



रामचंद्र चौगले
क्रीडा प्रतिनिधी



जगदीश पाटील
एन. एस. एस. प्रतिनिधी



कु. मनिषा वरगे
विद्यार्थीनी प्रतिनिधी



# आमचे गुणवंत

शिवाजी विद्यापीठाची ९८-९९
करीता गुणवत्ता शिष्यवृत्ती
रु. ५०००/-
→



सुनिता पाटील
बी. ए. -१



प्रकाश पाटील
बी. ए. - २

शिवाजी विद्यापीठाची ९८-९९
करीता गुणवत्ता शिष्यवृत्ती
रु. ५०००/-
←



प्रविण व्हनगुते
विशेष प्राविण्य
बी. एस्सी.-२



बाजीराव कुंभार
विशेष प्राविण्य
बी. एस्सी.-२



सागर आडके
विशेष प्राविण्य
बी. एस्सी.-२



बाबू पाटील
प्रथम श्रेणी
बी. एस्सी.-२



युवराज पाटील
प्रथम श्रेणी
बी. एस्सी.-२



संतोष घोडके
प्रथम श्रेणी
बी. एस्सी.-२



भास्कर सावंत
प्रथम श्रेणी
बी. एस्सी.-२



आर. सी. आडके
प्रथम श्रेणी
बी. एस्सी.-१



प्रतिभा रेडेकर
प्रथम श्रेणी
बी. ए.-२



कु. अस्मिता पाटील
प्रथम श्रेणी
बी. ए.-२



कु. राजश्री चव्हाण
प्रथम श्रेणी
बी. ए.-२



कु. वैशाली कुलकर्णी
प्रथम श्रेणी
बी. ए. - २

# क्रीडा नैपुण्य



प्रा. एन. डी. पाटील
शिवाजी विद्यापीठ बास्केटबॉल
निवड समिती चेअरमन व प्रशिक्षक



कोल्हापूर झोनल स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाचा
उपविजेता संघ प्रमाणपत्र स्विकारताना.



ज्ञानेश्वर राऊत
बी. ए.-२
आंतर विद्यापीठ बास्केटबॉल
स्पर्धेसाठी जोधपूर येथे निवड



कु. शामबाला चौगले
बी. ए.-३
आंतर विद्यापीठ जिमनास्टीक
स्पर्धेसाठी निवड



रामदास फराकटे
बी. ए.-३
आंतर विभागीय ॲथलेटिक्स
स्पर्धेसाठी कराड येथे निवड



कुमार चौगले
बी. ए.-२
वार्षिक क्रीडा स्पर्धा
सर्वसाधारण विजेतेपद



वसंत शेंडे
बी. ए.-१
आंतरविभागीय क्रॉसकंट्री
स्पर्धेसाठी निवड



नारायण रेपे
बी. ए. -२
आंतरविभागीय जिमनास्टीक
स्पर्धेसाठी निवड

# स्पंदन ९९-२०००

## अंतरंग


❖ संपादकिय

❖ साहित्य विभाग

★ मराठी

★ हिन्दी

★ इंग्रजी

❖ चिन्मय दर्शन

★ व्यंगचित्रे

★ महाविद्यालयीन विविध उपक्रम

★ छायाचित्रे

★ चित्रकला

❖ अहवाल

❖ परिशिष्ट

## हार्दीक शुभेच्छा !

# श्री. दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ सेवकांची सह. पतसंस्था मर्यादित, बिद्री (मौनीनगर)

*चेअरमन व संचालक मंडळ*

**आमचे आकर्षक व्याज दर**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| * | ठेवी | ४६ दिवस ते १२ महिने | :- | १३ % |
| | | १३ महिने ते ३६ महिने | :- | १४ % |
| | | ३७ महिने चे पुढे | :- | १५ % |
| | | दामदुप्पट | :- | ५६ महिने |
| * | कर्ज | | :- | १८ % |

सभासदांचे हीत हेच आमचे ब्रीद.




चित्र क्र. १

कला - संतोष मोरबाळे बी. एस्सी. २

# संपादकीय ...

**स्पंदनचा सप्रेम नमस्कार,**

१९९० मध्ये लावलेले दूधसाखर महाविद्यालयाचे रोपटे आता जवळजवळ १० वर्षाचे होत आहे. या महाविद्यालयाचा हा सातवा अंक तुमच्या हाती देताना आम्हांस विशेष आंनद होत आहे.

शिक्षण ही एक सामाजिक प्रक्रिया आहे. याच्या आधारेच आपण प्रगतीचा, सामाजिक परिवर्तनाचा आणि उन्नतीचा पर्वत चढून नव्या वैभवशाली भारताची निर्मिती करु शकतो. हे दूधगंगा वेधगंगा साखर कारखान्याच्या संचालक मंडळाने हेरुन हे महाविद्यालय सुरु केले. या दहा वर्षाच्या रोपट्याच्या कार्याची धुरा सध्या आदरणीय दिनकरराव जाधव हे त्यांच्या सहकाऱ्यांच्या समवेत काळजीपूर्वक व समर्थपणे संभाळीत आहेत. माझ्या सहकाऱ्याना विश्वास देऊन त्यांच्यात विश्वास निर्माण करीत आहेत. तर संस्थेचे सचिव मा. के. डी. गोसावीसो व मा. नामदेवराव भोईटे हे वेळोवेळी मार्गदर्शन करुन सर्वांना पुढे जाण्याची प्रेरणा देत आहेत. आदरणीय जाधव साहेबांचा शांत स्वभाव, समर्पित जीवन, ध्येयवाद, सर्वांशी प्रेमळ वागणूक यामुळे त्यांनी संस्थेच्या कार्यात आपला एक वेगळा ठसा उमटविला आहे.

मा. प्राचार्य एस. के. पाटील यांनी महाविद्यालयातील फक्त संख्यावाढीवरच समाधान मानले नाही तर शैक्षणिक गुणवत्ता जोपासण्यासाठी विविध उपक्रमामध्ये मार्गदर्शन करुन सहकार्य केले आहे. यावर्षी विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयींनी युक्त अशी कमवा शिका योजने अतंर्गत अभ्यासिकेचे सुरवात केली आहे. अभ्यासाबरोबर विद्यार्थ्यांचा वक्तिमत्व विकासाकडेही त्यांनी लक्ष दिले आहे. राष्ट्रीय सेवा योजना आणि खेळ यातून राष्ट्रभक्तीचे व शिस्तीचे धडे दिले आहेत. तर प्रौढ- साक्षरता अभियान ,एड्स अभियान व नशाबंदी अभियान यातून सामाजिक बांधिकची भावना वाढविण्याचे काम केले आहे. याचे जिवंत उदाहरण द्यायचे झाल्यास आम्ही सांगू इच्छितो की विद्यार्थी परिषद ९८-९९ यांनी या वर्षातील मॅगेझीनची सर्व फी ग्रंथालयाच्या समृध्दीसाठी देणगी म्हणून दिलेली आहे. खरे तर या विद्यार्थ्यांचे कौतुक करावे तितके थोडेच आहे. त्यांच्या या जागृक जाणीवेबद्दल आम्ही महाविद्यालयाच्यावतीने त्यांना शत शत धन्यवाद ! देत आहोत.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अंगी अनेक सुप्त गुणांची खाण असते. केवळ पुस्तकी शिक्षण संस्थेला अभिप्रेत नाही तर माणूस घडविणारे व माणसाला खऱ्या अर्थाने शहाणे करणारे शिक्षण त्यांना अभिप्रेत आहे. त्यांच्या ध्येयधोरणानुसारच आमचे महाविद्यालय वर्षभर विविध स्पर्धा आयोजित करुन विद्यार्थ्यांच्या गुणांचा विकास करण्यासाठी प्रयत्नशील असते. त्यामुळे 'स्पंदन' चे स्वरुप केवळ साहित्यिक राहू शकले नाही. महाविद्यालयीन जीवनात अनेक संस्मरणीय क्षणांच्या/घटनांच्या स्मृती अक्षरबध्द करावयाच्या असतात. या नियतकालिकाचे अंतरंग साकार होताना आम्ही ही जाणीव ठेवली आहे. जागे अभावी व सततच्या वाढत्या महागाईमुळे काही मोजक्याच लेखनास या अंकात प्रसिध्दी देण्यात आली आहे. ज्यांच्या लेखनास प्रसिध्दी मिळू शकली नाही त्यांनी नाउमेद न होता आपल्या अनुभवांना, विचारांना शब्दरुपात साकारण्यासाठी प्रयत्नशील रहावे. ज्यांच्या लेखनास प्रसिध्दी मिळाली आहे. त्यांनी हेच आपले अंतिम यश म्हणून भारावून जाऊ नये तर कलेची नवनवीन

अंतरंगे न्याहळून त्यांना शब्दात सामविण्यासाठी सातत्याने प्रयत्नाची पराकष्टा करावी अशी प्रेमळ सूचनाही आम्ही यावेळी करत आहोत.

याखेरीज या अंकात आम्ही विद्यार्थ्यांच्या कुंचल्यातील प्रभावी शक्तीला ही वाव दिला आहे. माणूस हा विनोदाशिवाय जगू शकत नाही हे पूर्णसत्य लक्षात घेऊन या अंकात व्यंगचित्रे हे नवीन सदर आम्ही सुरु केले आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या चित्रकलेचा व सुंदर छायाचित्रांचाही समावेश आम्ही आवर्जुन या अंकामध्ये केला आहे.

अंक सुबक व्हावा म्हणून मा. प्राचार्य सतत मार्गदर्शन व सूचना करीत राहिले. संपादक मंडळातील सर्व सदस्यांनी हा अंक तयार करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या सततच्या सहकार्यामुळेच हे अवघड कार्य आम्ही सिध्दीस नेऊ शकलो. सहकारी प्राध्यापक वर्ग, तसेच सर्व प्रशासकीय कर्मचारी, सेवक वर्ग यांनी अंकाच्या प्रसिध्दीसाठी जे प्रयत्न केले त्याबद्दल हार्दिक आभार.

या अंकाच्या सिध्दीसाठी आनंद प्रिंटींग ऑफसेट, तारळे चे मालक श्री. सदाशिवराव साबळे (तात्या) यांनी हे काम आपुलकीच्या भावनेने स्विकारले. त्यांच्या कर्मचारी वर्गाने ते आपलेच समजून केले त्याबद्दल आणि या अंकाच्या सिध्दीसाठी ज्ञात-अज्ञात ज्या ज्या व्यक्तींनी हातभार लावला त्या सर्वांचे मन:पुर्वक आभार मानणे आम्ही आमचे कर्तव्य समजतो.

**प्रा. राजेंद्र चोपडे**

संपादक

# व्यवस्थापन समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अध्यक्ष | : | मा. श्री. दिनकररावजी जाधव |
| २) | उपाध्यक्ष | : | मा. श्री. विजयसिंह मोरे |
| ३) | सदस्य | : | मा. आम. नामदेवरावजी भोईटे |
| ४) | सदस्य | : | मा. श्री. बापूसाहेब भोसले |
| ५) | सचिव | : | मा. श्री. के. डी. गोसावी |
| ६) | सेक्रेटरी | : | मा. प्राचार्य एस. के. पाटील |
| ७) | शिक्षक प्रतिनिधी | : | मा. श्री. नंदकुमार धोंडी पाटील |
| ८) | शिक्षक प्रतिनिधी | : | मा. श्री. यशवंत सिताराम पाटील |
| ९) | शिक्षक प्रतिनिधी | : | मा. श्री. हरीदास दत्तू धायगुडे |
| १०) | शिक्षकेत्तर प्रतिनिधी | : | मा. श्री. महादेव कृष्णा भोईटे |

# मराठी विभाग

*जैसी पुस्पामाजी पुस्प मोगरी । की परिमळामाजी कस्तुरी ।*
*तैसी भासांमाजी साजिरी । मराठीया ॥*

**–फादर स्टीफन**
(खिस्तपुराण, शके १५३६)

विभागीय संपादक

**प्रा. आनंद वारके**

# अनुक्रमणिका

## गद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १) | राष्ट्रीय एकात्मता दिन | मारुती फराकटे | बी. ए. २ |
| २) | बदलता समाज आणि बदलती संस्कृती | शरद पाटील | बी. ए. २ |
| ३) | राजकारणातील युवकांचा सहभाग | युवराज पाटील | बी. एस्सी ३ |
| ४) | विज्ञान युगात माणुसकीचा ऱ्हास | उमेश वारके | बी. ए. २ |
| ५) | भारतासमोरील आव्हाने | कु. सरिता जाधव | बी. ए. २ |
| ६) | आजचा शिक्षक | कु. मनिषा गुरव | बी. ए. १ |
| ७) | आजचा युवक आणि बदलती परिस्थिती | सागर खद्रे | बी. ए. २ |
| ८) | निशाण-ए-कारगील | मानसिंग साबळे | बी. एस्सी १ |
| ९) | ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी | ज्योतिराम पाटील | बी. ए. ३ |
| १०) | प्रेम : अनेक अर्थ | | |
| | १ - प्रेमाची शोकांतिका | हिंदूराव खोत | बी. ए. १ |
| | २ - प्रेम हेच अंतिम सत्य | विजय वाईगडे | बी. एस्सी १ |
| | ३ - प्रेम : योग्य अयोग्य | नामदेव पाटील | बी. ए. १ |
| | ४ - प्रेम | भालचंद्र पोतदार | बी. ए. १ |
| ११) | मानवी जीवनाची शोकांतिका | एस. के. तिकोडे | बी. एस्सी. २ |
| १२) | जखमी सैनिक -कॅ. विक्रांत पाटील | रमेश कोरे | बी. ए. ३ |
| १३) | एक कळी कुस्करलेली | विजय तिकोडे | बी. एस्सी. १ |


## पद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १) | दुरावा | मारुती कांबळे | बी. ए. १ |
| २) | त्या ओसाड माळावर | विश्वनाथ पाटील | बी. एस्सी. २ |
| ३) | निसर्ग | रसूलसो पिंजारी | बी. ए. ३ |
| ४) | ओढा | सुरेश यादव | बी. ए. २ |
| ५) | का? | नेताजी पाटील | बी. ए. १ |
| ६) | ऊसकरी शेतकरी | तानाजी पाटील | बी. ए. ३ |
| ७) | प्रश्न ? | सरिता जाधव | बी. ए. २ |
| ८) | मित्रत्व | मारुती फराकटे | बी. ए. १ |
| ९) | आई | चंद्रकांत बोंगार्डे | बी. ए. १ |
| १०) | फुलपंख | हेमंत पाटील | बी. ए. १ |
| ११) | अमृता (देशपांडे) | कु. रुपाली पताडे | बी. ए. १ |
| १२) | देशप्रेम | शिवाजी पाटील | बी. ए. ३ |
| १३) | एक क्षण | कु. मिनाक्षी पाटील | बी. ए. १ |
| १४) | उत्तर | विनोद यमगेकर | बी. ए. ३ |
| १५) | फक्त तुझ्यासाठी | सतीश पाटील | बी. एस्सी. ३ |
| १६) | प्रेम कुणावर करावं ? | नारायण पाटील | बी. ए. २ |
| १७) | प्रेमभेट | ज्योतिराम पाटील | बी. ए. ३ |
| १८) | चारोळ्या | कु. सविता पाटील | बी. ए. ३ |
| १९) | हे असं का होतं ? | भास्कर सावंत | बी. एस्सी. ३ |
| २०) | भावनांचा उद्रेक | रुपेश चौगले | बी. एस्सी. १ |
| २१) | एक तू | अमर पाटील | बी. ए. २ |
| २२) | चारोळ्या | कु. अर्चना पाटील | बी. ए. १ |
| २३) | श्रध्दा | कु. रुपा कांबळे | बी. ए. १ |
| २४) | तीन गोष्टी | महेश पाटील | बी. ए. १ |

# राष्ट्रीय एकात्मता दिन

मारुती फराकटे बी. ए. २

जगातील दोन महासत्ता. महासत्ता बनू पाहणारे देश, आणि दोन्ही महासत्ताच्या बाजूने जाणारे देश, यामुळे जगामध्ये अशांतता निर्माण झाली आहे. जगामध्ये शांतता टिकवायची असल्यास प्रथम त्या राष्ट्रामध्ये राष्ट्रीय एकात्मता निर्माण होण्याची गरज सांगणारा हा लेख........

पश्चिमेच्या पांढऱ्या शुभ्र क्षितीजावर निळ्या-हिरव्या रंगाच्या छटा उमटताना आमच्या इथे मात्र कोणताही दिवस साजरा करताना रक्ताचा नैवेद्य द्यावा लागतो. आणि मग आठवतात ते दिवस, ज्या क्रांतीकारकांनी आपल्या प्राणाची आहुती देवून आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले व तरुण पिढीला एक मंगल पहाट दाखविली.

ग्रीक विचारवंत प्लेटो म्हणतो, 'आपल्या राष्ट्रा इतका जवळचा आपला दुसऱ्या कोणाशीही संबंध नसतो.' आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे पूर्ण झाली. नुकतेचे आपण भारतीय स्वातंत्र्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे केले. अनेक ज्ञात, अज्ञात हुतात्म्याच्या बलिदानाने क्रांतीवीराच्या शौर्यशाली प्रयत्नाने भारतमातेला स्वातंत्र्य मिळाले. पण त्या नररत्नांचे एकतेचे स्वप्न साकार झाले का ? देशाचे भूषण म्हणून ज्याचा गौरव केला जातो असा तिरंगा ध्वज आज अनेक ठिकाणी जाळला जातो. आणि म्हणूनच या लोकशाही देशामध्ये अस्थिरता निर्माण होऊ लागली आहे. त्याचबरोबर लोकांचा लोकशाहीवरील विश्वास ढासळू लागला आहे.

आज देशामध्ये अनेक प्रकारचे प्रश्न निर्माण होत आहेत. एक प्रश्न सुटतो ना सुटतो तोच दुसरा प्रश्न उभा आहेच. जातीय दंगली, जातीयता, प्रांतीयता, भ्रष्टाचार, बेकारी हे सर्व प्रश्न देशाला भेडसावत आहेत.

भारताचे नंदनवन म्हणून ज्याचा उल्लेख केला जातो ते काश्मीर आज रक्ताच्या शिड्यांनी शिंपले जात आहे. आजच्या या विज्ञानयुगामध्ये देशनिष्ठा उरली नाही. स्वार्थासाठी माणूस अनेक प्रकारचे पाप करत आहे. ' जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले !' अशी म्हणणारी माणसे आज दुसऱ्याच्या रक्तावर आपली रंगपंचमी साजरी करु पहात आहेत. कुठे हरविली ती जीवनमुल्ये ? व कुठे हरवला तो सदाचार ? असा प्रश्न आपल्यासमोर उभा रहातो. म्हणूनच अनेक प्रकारचे प्रश्न आपल्यासमोर पहावयास मिळतात.

आसाममध्ये उल्फा अतिरेक्यांनी तर कहरच केला आहे. तेल समृध्द असणारे आसाम आज पेटत आहे. पंजाबमध्ये शीख अतिरेकी, काश्मीरच्या बाबतीत तर बोलायलाच नको ! मुंबई, दिल्ली या शहराच्या मध्ये बॉंबस्फोट घडवून आणून शहरात दशहत निर्माण केली जात आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे जीवन विस्कळीत होत आहे. जर देशामध्ये अशाप्रकारच्या समस्या निर्माण होत राहिल्या तर देशाची राज्यव्यवस्था कोलमाडून जाईल. आज तरुणांची वैफल्यावस्था व वाढती बेकारी यामुळे तर आणखीनच भर पडली आहे. नुकतेच चाच्यांनी इंडियन एअरलाईन्सच्या विमानाचे अपहरण केले त्यामध्ये काहीची हत्याही केली. आपण आज २१ व्या शतकात पदार्पण केले आहे. वरील सर्व समस्या चिघळल्या तर भारताचे भवितव्य कसे असेल ?

दरवर्षी २० आक्टोबर आपण 'राष्ट्रीय एकता दिन' साजरा करतो.

'मिले सुर मेरा तुम्हारा' हे भीमसेन जोशी यांचे दूरदर्शनवरील गीत ऐकताना बरे वाटते. असा सुर प्रत्येक भारतीयाचा जुळावा हीच अपेक्षा !

# बदलता समाज आणि बदलती संस्कृती

शरद पाटील बी. ए. २

**सांस्कृतिक वातावरण असणाऱ्या भारतासारख्या देशात विज्ञान, भौतिकवाद आणि चंगळवादी संस्कृती वाढत चालली आहे. बदलता समाज आणि बदलती संस्कृती याचा हा आढावा..........**

जरी आपला देश ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानाच्या बाबतीत पुढे गेला असला तरी तो व्यसनाच्या जाळ्यात सापडला आहे. आजचा समाज आपली भारतीय संस्कृती विसरु लागला आहे. व्यसनामुळे आजचा माणूस माणूस राहिला नाही तो राक्षस बनला आहे. आजच्या समाजाचे चित्र समोर धरले तर भिती वाटू लागते. कारण आजची वाढती लोकसंख्या व या वाढत्या लोकसंख्येमुळे मनुष्य मनुष्याला खायला उठला आहे.

या वाढत्या लोकसंख्येमुळे आज आपल्या देशात गरीबी वाढत आहे, दारिद्रय वाढत आहे. या वाढत्या गरीबीमुळे आजचा समाज, आजचा मनुष्य आपले पोट भरण्यासाठी आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी तो भ्रष्टाचाराकडे वळलेला आहे. तो खून करु लागला आहे. दरोडे घालू लागला आहे. तो व्यसनाच्या जाळ्यात सापडलेला आहे. या वाढत्या लोकसंख्येमुळे माणसाला आपल्या गरजा भागवता येत नाहीत. आणि तरी सुध्दा आपल्या वडिलांनी आपल्या आजोबांनी केलेल्या चुका आपणही करु लागलेला आहे. म्हणजेच आपण शिकलेलो असूनसुध्दा लोकसंख्येवर नियंत्रण ठेवू शकत नाही म्हणजे आपणच आपला खड्डा काढून त्या खड्यामध्ये उडी मारण्याचा प्रयत्न करतोय.

आपल्या या छोट्याशा देशाचा जगामध्ये लोकसंख्येच्या बाबतीत दुसरा क्रमांक लागतो. या छोट्याशा देशात भरगच्च भरलेल्या लोकसंख्येमुळे गरीबी खूप वाढलेली आहे. या गरीबीमुळे बालमजुरांचे प्रमाण वाढू लागले आहे. भ्रष्टाचार वाढू लागला आहे. बालगुन्हेगारी व स्त्रियांवर अत्याचार व बलात्काराचे प्रमाण वाढू लागले आहे. हे दारिद्रय हटविण्यासाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब करु लागला आहे. आणि अशा प्रकारे आपल्या समाजाची , देशाची परिस्थिती वेगळे वळण घेऊ लागली आहे. अशा प्रकारे आपला समाज पुर्णत: बदलून गेलेला आहे. आणि या बदलत्या समाजामध्ये 'मोह ' नावाच्या राक्षसाने प्रवेश केलेला आहे. या 'मोह ' नावाच्या राक्षसाने मानव समाजाचा चेहराच बदलून टाकलेला आहे.

आणि या बदलत्या समाजामध्ये आपली संस्कृती बदलत चाललेली आहे. मनुष्य पाश्चात्य संस्कृतीचा स्वीकार करु लागला आहे. आणि या बदलत्या संस्कृतीमुळे व बदलत्या समाजामध्ये वेगवेगळे आजार निर्माण होऊ लागले आहेत. आपल्यासमोर काटा आहे हे पाहून सुध्दा आपण त्या काट्यावर पाऊल देण्याचा प्रयत्न करतो आहोत. जर का आपली पुढची पिढी निरोगी, आर्थिक ,सामाजिक व राजकीयदृष्ट्या स्वयंपूर्ण बनवायची असेल तर आपण आतापासूनच त्यासाठी पाऊले उचलली पाहिजेत. नाहीतर आपण ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, औद्योगिक क्षेत्रात जी झेप घेतलेली आहे ती वाया जाईल असे म्हाणावे लागेल. आपले पुढचे भवितव्य चांगले घडवायचे की मोडायचे हे आपल्याच हातात अवलंबून आहे.

• • •

# राजकारणातील युवकांचा सहभाग

युवराज पाटील बी. एस्सी ३

**भारतासारख्या लोकशाहीच्या मूल्यांची जपणूक करणाऱ्या राष्ट्रात सरकारच्या अस्थिरतेमुळे आणि वारंवार होणाऱ्या निवडणुकामुळे तरुणांचा राजकारणातील सहभाग वाढत चालला आहे. याच्या परिणामाचा आढावा घेणारा हा लेख.......**

आधुनिक युगात अनेक देश विविध उत्क्रांती झेपावताहेत त्याचे मुख्य कारण म्हणजे, राज्याच्या-देशाच्या राजकारणात राजकीय स्थैर्य साधून एखाद्या मजबूत ध्येय - धोरणी पक्ष त्या देशाची सूत्रे हाती घेतो. तेव्हा साहजिकच तो देश स्वयंपूर्ण असतो. पण या नव्या शहस्त्रकात - शतकात आपल्या देशापुढे अगदी गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत अनेक पक्ष आहेत. कुठेच स्थैर्यता दिसत नाही. एकाही पक्षाला बहुमत सिध्द करता येत नाही. परिणामी अस्थिरतेचे हे वारे शासनाच्या- देशाच्या तिजोऱ्यांना घातक ठरते.

प्रत्येकाचं स्वतंत्र अस्तित्व हे देशातील भिन्न-भिन्न विचार-वागणूक पटवून देतं. त्यातच या लोकशाही अशा गोंडस नावाखाली ही अनेक वांडगूळ रुजू लागतात. या लोकशाहीच्या मार्गातील राजकारणात, राजकारण निव्वळ धंदा होऊन गेला आहे. तथापि राजकारणाचा अर्थ-दर्जा कुठे राहिलाय, कोण जाणतो ? त्यासाठी या देशातील तरुणांनी-युवकांनी योग्य चाकोरीतून देशाचा गाढा पुढ घेऊन जाण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले पाहिजेत.

या निवडणुकांतून सहकारात वा राजकारणात प्रतिनिधी निवडून देतात. आपल्या भारत देशातील ऐंशी लाख खेडी ग्रामीण विभागातून जास्तीत जास्त प्रतिनिधी निवडतात. पण तिथे कुठे शर्त आहे का? की तो प्रतिनिधी क्वालिफाईड असावा. तो राजकीय तज्ञतेबरोबर सर्व गोष्टींचा जाणकार असावा. परंतु एखादा अशिक्षितच एखाद्या राज्याचे नेतृत्व करत असेल तर, लोकशाही मार्गाच्या नेतृत्वाला वा पदाला काही किंमत राहते का ? तसे नेतृत्व त्या-त्या ठिकाणच्या परिस्थितीस-विकसनशीलतेस ठरवणे ठीक असेल तर मग थोड्या प्रमाणात सुसूत्रता ठरु शकते.

पण अलिकडे विकसनशीलतेला अडथळा करणाऱ्या कित्येक योजना खेड्यापाड्यापासून-शहरापर्यंत येतात.

उदा. आरक्षण.

स्त्री- राखीव, मागास, इतर मागास, भटक्या जमाती इत्यादींना प्रतिनिधीत्व ठरवून ते कार्य सोपवायचं पण मानवी प्रतिष्ठा ही प्रत्येक जात-जमातपुढे यावी म्हणून हे आरक्षण असेल तर ते लोक त्याचा निश्चितच फायदा घेतात का? अथवा उपयोग करतात का ? उदा. -एखादी मागास महिला आपल्या गावचे 'सरपंच' पद भूषवत असेल तर तिला कमीत-कमी ग्रामपंचायत ऑफिस कुठे आहे किंवा तालुक्याचे पंचायत समिती ठिकाण कुठे आहे याची तरी माहिती असावी. पण ते ही नसेल तर मग तो नाममात्रच प्रतिनिधी राहतो. त्यासाठी देशातील

जबाबदार लोकांनी तातडीने विचार करुन पाऊल उचलले पाहिजेत त्यात सर्व युवकांचा पाठिंबा असावा. सक्रियता असावी.

या आरक्षणाच्या आव्हानांने होतकरु, सर्व समावेशक, दूरदृष्टी जाणकार बहुतांशी नेतृत्वाची वा नव्यानेच राजकारणात पदार्पण करणाऱ्या उत्साही तरुणांची -युवकांची कुचंबणा होते. तसेच भारतीय राजकारणात एक सूत्र होऊन राहिलेली पध्दत म्हणजे विशिष्ट घराणेशाही. त्यांची जणू मक्तेदारीच, एखादा प्रतिनिधी जन-माणसात चांगले स्थान निर्माण करतो. त्याच्याशी जवळीक साधून जिव्हाळ्याचे संबंध ठेवतो. तसा तो कष्टाळू असेल सर्व सामाजिक, राजकीय, सहकारी व सांस्कृतिक कामात आघाडीवर असतो. पण त्याचा वंशज तसा असू शकतो का?

यावर या लोकशाही मार्गातील प्रत्येक नागरीकानं विशेषत: युवकांनी अगदी गंभीरतेनं विचार केला पाहिजे. या सगळ्या प्रश्नातून वा आव्हानातून योग्य वैचारिक शैलीतून या २१ व्या शतकातील आपल्या लोकशाही मार्गाच्या भारत देशाला खऱ्या अर्थानं सावरल पाहिजे.

• • •

## पृथ्वी- आपणाला माहित आहे का ?

- पृथ्वीवर एकूण देश - २२५
- २१ % पृथ्वीवर जमिनीचे क्षेत्रफळ - १४ कोटी ५० लाख चौ. कि. मी.
- ७१ % पृथ्वीवर सागराचे क्षेत्रफळ - ३६ कोटी ३७ टन चौ. कि. मी.
- पृथ्वीचा व्यास - १२,८०० कि. मी.
- पृथ्वीचा ध्रुवीय व्यास- १२,७१४ कि. मी.
- विषुववृत्तीय परीघ - ४०,०६७ कि. मी.
- पृथ्वीचे सूर्यापासूनचे अंदाजे अंतर - २४० दशलक्ष कि. मी.
- पृथ्वीपेक्षा सूर्य १३ लाख पटीने (आकारमान) मोठा आहे.
- सर्वात मोठा ग्रह - गुरु
- सूर्यमालेतील सर्वात वेगवान ग्रह - शनी
- सूर्याची उर्जा निर्मिती हायड्रोजन अणुंच्या एकत्रिकरणाने होते.
- सूर्यग्रहण होताना पृथ्वी आणि सूर्य यांच्यामध्ये चंद्र असतो.
- पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या मध्यातून जाणाऱ्या काल्पनिक वर्तुळास विषुववृत्त म्हणतात.

## भूकंपाची प्रमुख कारणे

- जमीनीचे आकुंचन व प्रसरण पावणे.
- भूगर्भातील पाण्याचे बाष्प होणे.
- सुप्त ज्वालामुखी जागृत होणे.

# विज्ञान युगात माणुसकीचा ऱ्हास

उमेश वारके बी. ए. २

**संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्काचा जाहीरनामा घोषित केला. तेव्हापासून १० डिसेंबर हा दिवस सर्वत्र 'मानवी हक्क दिन' म्हणून साजरा केला जातो. अशा या मानवी हक्कावर प्रकाश टाकणारा हा लेख.........**

'मानव' यामध्ये आहेत मुळात तीन शब्द. पण या तीन शब्दामध्ये किती मोठा अर्थ सामावला आहे ! आज प्रत्येकजण शांततेसाठी झगडत आहे. आजच्या समाजाला आवश्यक आहे शांतता. ही शांतता प्रस्थापिक करण्याचे कार्य मानव करत असतो. १० डिसेंबर हा दिवस सर्वत्र मानवी हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. इ.स. १९१४ ते १९१८ या चार वर्षाच्या काळात झालेले पहिले महायुध्द आपल्याला काय सांगते? मानवी जीवनाचा विध्वंस या महायुध्दाने केला. या युध्दात जवळ जवळ २७ लाख लोक ठार झाले. २५ लाख सैनिक कायमचे अधू झाले. मनुष्या हानीमुळे अनेक कुटूंबे उद्धस्त झाली. असे जीवन आज आपण जगणार आहोत का ? दुसऱ्या महायुध्दात एकट्या इटलीचे ७ लाख सैनिक मरण पावले. म्हणूनच ही आकडेवारी आज लक्षात घेता प्रत्येक माणसाने आज तरी माणसासारखे वागले पाहिजे. शांतता व सांमजस्याने प्रश्न सोडविण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने प्रयत्न केला पाहिजे.

वंश, धर्म , जाती, लिंग, राष्ट्र या आधारावर माणसामाणसात आपण भेदभाव मानू नये . माणूस म्हणून प्रत्येक व्यक्तिच्या काही गरजा व प्रश्न असतात. ते सोडविण्यासाठी आपण एकमेकांना मदत केली पाहिजे. द. आफ्रिकेतील श्वेतवर्णीय सरकारने काळे व गोरे असा भेद करुन कृष्णवर्णीयांना मानवी हक्क नाकारले होते. कृष्णवर्णीयांचे नेते नेल्सन मंडेला यांना तीस वर्षाचा तुरुंगवास तर बेन्जामिन नेलो या प्रिटेरियाच्या कृष्णवर्णीय कवीला फाशी दिली होती. असे हे कृत्य मानवी हक्काला अयोग्य होते. आज आपल्या देशामध्ये अनेक लोकांच्यावरती अन्याय, अत्याचार होत आहेत. हे मानवी हक्काच्या पायमल्लीचे उदाहरण नव्हे काय ? आणि म्हणूनच याला अनुसरुन भारत सरकारने 'राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची' स्थापना केली आहे.

आजच्या या विज्ञानाच्या युगामध्ये माणुसकी संपत चालली आहे. स्वार्थासाठी माणूस अनेक प्रकारचे पाप करत आहे. 'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले ' अशी म्हणणारी माणसे आज मात्र दुसऱ्याच्या रक्तावर आपली रंगपंचमी साजरी करु पाहत आहेत. मग कुठे हरवली ती माणुसकी ? व कुठे हरवला तो सदाचार ? असा प्रश्न निर्माण हातो. मानवता वादावर आधारीत आपली संस्कृती आहे पण या मानवतेला हिंसाचार नावाचा कॅन्सर लागला व माणुसकी दूर होऊ लागली. म्हणूनच आज अनेक वक्तृत्व स्पर्धेतही आपल्याला ''कुठे कुठे शोधु तुला, माणुसकी सांग मला ! ''असे विषय ठेवावे लागतात. मानवता जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करावा लागतो.

अशा या मानवी दिनादिवशी आपण सर्वांनी मानवी एकतेची, एकसंघतेची शपथ घेतली पाहिजे. कारण आजच्या माणुसकीवर उद्याचा समाज तयार होत असतो. उद्याच्या समाजावर राष्ट्राचे भवितव्य अवलंबून असते. तेव्हा चला तर मग आपण सुध्दा शपथ घेऊ, मानवतेची, मानवतेच्या प्रेमाची, सांमजस्याची, एकमेकांना सहकार्य करण्याची !

• • •

# भारतासमोरील आव्हाने

सरिता जाधव बी.ए. २

## भारताच्या विकासशीलतेसमोर उभी ठाकलेली आव्हाने ...............

अखेर अपहरणनाट्य संपले. नववर्षाची भेट सर्व भारतवासियांना मिळाली. नववर्षाची सुखद भेट म्हणून स्वीकारतानाअंतरंगामध्ये काहूर माजल्याशिवाय राहत नाही. तीन कट्टर अतिरेक्यांच्या बदल्यात आपल्याला दिलासा देणारी ही घटना मनामध्ये अनेक प्रश्न निर्माण करते. तब्बल सात दिवस सात अतिरेक्यांनी १५४ प्रवासी व कर्मचारी यांना ओलिस ठेवून भारत सरकारपुढे नवीन सहस्त्रकातील एक आव्हान निर्माण केले. तिसरी शक्ती म्हणून जग आपल्याकडे पहात असताना आपल्यातील उणिवा प्रकर्षाने समोर आल्या. त्यांचा ऊहापोह झाला पाहिजे.

विमान अपहरणाची ही पहिलीच वेळ नाही. तरीदेखील आपण यावर कायमचा तोडगा काढू शकत नाही. अशा घटना संपूर्ण देशाला मानहानीकारक आहेतच शिवाय एवढ्या मोठ्या देशाला पाच-सात माणसापुढे झुकवायला लावतात ही मोठी शरमेची गोष्ट आहे. घटना घडल्यानंतर विचारमंथन होते. मात्र आमुलाग्र बदल घडताना दिसत नाही. आजतरी आपला भारत देश आर्थिक उदारीकरणाच्या दुसऱ्या टप्प्यात असल्याचा मोठा गवगवा आपले सरकार करीत आहे. संक्रमण अवस्थेच्या टप्प्यातून जाताना आपल्याला काही गोष्टीकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही.

संपूर्ण जग आज माहिती व तंत्रज्ञानामुळे जवळ येत आहे, देशादेशाचा व्यापार, उद्योग, नोकरी या निमित्ताने अनेकवेळा आज परदेशगमन काही लोकांच्या बाबतीत नित्याचीच गोष्ट होऊ पाहत आहे. सध्यातरी दूरच्या प्रवासासाठी विमानाला पर्याय नाही. हवाई प्रवास हा निर्धोक असा व्हायला पाहिजे. सर्व प्रवाशांच्या सुरक्षेची हमी या प्रवासात घेतली जावी. तांत्रिक बिघाड वा अन्य कारणाने होणारे अपघात टाळले जावेत. याजबरोबर विमान अपहरणाच्या घटनांची पुनश्री अजिबात व्हायला नको पाहिजे. आज आपणाला या मुद्दयावर चर्चा करावयास हवी.

विमान अपहरणाच्या घटना घडूच नयेत म्हणून आपली भक्कम अशी सुरक्षा यंत्रणा पाहिजे. आज भारतात कोणतीही मोठी दुर्घटना घडली की, आमचे प्रवक्ते सांगतात, यामागे पाकिस्तानच्या आय. ए. एस. चा हात आहे. म्हणून पाकिस्तानची गुप्तहेर संघटना गेली अनेक वर्षे या घातपाताच्या कारवाईनी आपल्या देशाला त्रस्त करत आहे. आपण मात्र त्यांचा निषेध करण्यापलिकडे काही केले नाही. भारतासारख्या बलाढ्य देशाला पाकिस्तानने छुप्या युध्दाने जेरीस आणले आहे. युध्द भूमीवर आपली डाळ शिजत नाही ही त्यांनी परवाच्या कारगील मोहिमेतही अनुभवले आहे. त्यामुळे ते छुपे युध्द खेळत आहेत. आणि आम्ही त्यांच्या भक्ष्यस्थानी पडत आहोत. आज अनेक जवान, पोलिस काश्मीर, नागालँड यासारख्या ठिकाणी अतिरेक्यांच्या घातपाती कारवायामध्ये बळी पडत

आहेत. पण आपला देश खंबीरपणे कधीही उभा राहिला नाही. आज अमेरिका आपली तत्वे दुसऱ्या देशाच्या गळी उतरवण्यासाठी आर्थिक निर्बध लादू शकते. भारतासारख्या देशातील कंपन्यावरही निर्बध लादले. आपण मात्र अगदी निषेधाचा लिफाफा देण्याव्यतिरिक्त काहीही करत नाही. आय. एस. आय. च्या कारवाया नेपाळमधून चालतात ही गोष्ट आता उघड होत आहे. याचा सुगावा सरकारला केव्हाच असावा. तरीसुध्दा आपण नेपाळला अधिकारवाणीने काही बोललेलो नाही. आपल्या देशाच्या आधारावर आज नेपाळची अर्थव्यवस्था आहे.

नेपाळला आपले सहकार्य आहे आणि नेपाळच्या भूमीवरुनच पाकिस्तान आपल्याला सतावत आहे. अशावेळी नेपाळला कडक इशारा दिला पाहिजे. अन्यथा आपल्या देशातील लोकांच्या जीवाशी होणारा खेळ थांबणार नाही. आपले सहिष्णुताधोरण चांगल्यासाठी आहे. याचा अर्थ दुसऱ्याने कितीही जुलूम केले तरी सोसायचे असा होत नाही. आपल्या शेजारी देशांना आपण नेहमी मदतीचा हात दिला आहे. पण त्या शब्दानेच जर आपल्याला त्रास दिला तर त्याच्यासाठी 'जशास तसे धोरण ' भारताने स्वीकारले पाहिजे तरच आपल्याला म्हणता येईल,

'' सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ता हमारा
हम बुलबुले है इसकी
ये गुलसिता हमारा ''

• • •

## महाराष्ट्र-आपणाला माहित आहे का ?

- विदर्भातील एकूण जिल्हे - ११ .
- महाराष्ट्र राज्याच्या उत्तर सीमेवरील पर्वत - सातपुडा.
- महाराष्ट्र राज्याच्या समुद्र किनाऱ्याची एकंदरीत लांबी - ७२० कि. मी.
- कोकण रेल्वेच्या रुळांची लांबी - ७६० कि. मी.
- महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना - प्रवरानगर.
- महाराष्ट्र राज्यामधील सर्वात मोठा पाण्यावर आधारित विद्युत जनित्र प्रकल्प-कोयना.
- महाराष्ट्रातील सिमेंटचे कारखाने सर्वात जास्त असणारा जिल्हा - गडचिरोली.
- महाराष्ट्रातील मॅगेनीज शुध्दीकरण प्रकल्प - कन्हान.
- भारतात सर्वप्रथम रोजगार हमी योजना सुरु होणारे राज्य- महाराष्ट्र.
- १९९६ सालचे महाराष्ट्रातील एकूण जिल्हे - ३१
- महाराष्ट्र राज्यात चंद्रपूर जिल्ह्यात ताडोबा हे राष्ट्रीय उद्यान आहे.
- सह्याद्रीतील सर्वात उंच शिखर - कळसूबाई . (उंची- १,६४६ मी.)
- महाराष्ट्रातील सर्वात कमी लोकसंख्या असलेला जिल्हा - गडचिरोली.
- महाराष्ट्र राज्याने भारतीय उपखंडाचा व्यापलेला भाग - ८.९ % .
- सिंधुदुर्ग जिल्ह्याची निर्मिती - १९८१ साली.

# आजचा शिक्षक

कु. मनिषा गुरव बी. ए. १

**'गुरु' बद्दल पूर्वीच्या काळी असणारी आत्मीयता या लेखात व्यक्त करतानाच आजच्या समाजात शिक्षकाकडून असणाऱ्या अपेक्षाही येथे एका विद्यार्थिनीने व्यक्त केल्या आहेत. ........**

कुंभाराची भूमिका घेऊन विद्यार्थ्यावर संस्कार घडवण्याचे कार्य प्राचीन काळापासून शिक्षकच करीत आहेत. आजही परंपरा चालू आहे. आजच्या शिक्षणापेक्षा प्राचीन काळी असलेल्या शिक्षणपध्दतीमध्ये शिक्षकाला फार महत्व होते. त्या काळी शिक्षण धर्माशी निगडीत होते. भारतीय संस्कृतीने गुरुचे महात्म्य सदैव गायलेले आहे.

'' गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु । गुरुर्देवो महेश्वर : ।
गुरु साक्षात परब्रम्ह । तस्मै श्री गुरवे नम : । ''

प्राचीनकाळी गुरुला देवत्व प्राप्त झाले होते. गुरुसमोर सत्ताधारी राजेसुध्दा नतमस्तक होत असत. ''Teachers are the builders of the nation''असे म्हटले जाते. म्हणजेच शिक्षकच राष्ट्र घडवू शकतो. यावर असलेली सर्वांची नितांत श्रध्दा होय. कोवळ्या कळ्यांचे फुलात रुपांतर करणारा आपले वर्चस्व पणाला लावून कोवळ्या मुलांचे रुप आदर्श करणाऱ्या शिक्षकाचा संबंध सजीव मुलाशी येत असतो.

शिक्षकाचे व्यक्तिमत्व, समाजातील स्थान, पालकांशी संबंध, अध्ययन व अध्यापन या महत्वाच्या असतात. आई-वडिलांचे सुध्दा न ऐकणारी मुले शिक्षक सांगतील त्याप्रमाणे वागतात. विद्यार्थी शिक्षकाचे अनुकरण करतात. आईची माया व पित्याचे कर्तव्य मुलांना देण्याचे महत्वाचे कार्य शिक्षकाला करता आले पाहिजे. '' आधी केले मग सांगितले '' या उक्तीप्रमाणे शिक्षकाचे कार्य पाहिजे.

वर्गाच्या चार भिंतीच्या आत शब्दांचे भवितव्य आकार घेत असते. याचा कल्पक रचनाकार व शिल्पकार शिक्षकचअसू शकतो. शिक्षकच बालपिढीला जीवनाची मूल्ये, जीवनाचा मार्ग दाखवितो म्हणून अंतिम यशाचा उद्गाता शिक्षकच आहे. आजच्या गतिमान, राष्ट्रीय, सामाजिक विकासात शिक्षणाचे स्थान आणि मूल्यांची घसरण होत चालली आहे. हे पाहून विनोबा म्हणाले होते की, '' भारतात सर्वत्र अंधार भरुन दिसतो. तथापि शिक्षकांच्या रुपाने प्रकाशाचा अंधुकसा किरणही दिसतो आहे. जर भारतातील शिक्षक जागा झाला तर ते प्रकाशमान झाल्याशिवाय राहणार नाही.'' समाजाची सेवा करणारा, राष्ट्राच्या कामी येणारा, संस्काराची शिकवण, मानवी मूल्यांचे संक्रमण, स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा याची जाण शिक्षकच प्रभावी पणे करु शकतो. पण अलिकडील काळात शिक्षकी पेशाची प्रतिष्ठा कमी होत आहे. ही अत्यंत दुदैवाची बाब आहे.

आजच्या आधुनिक काळात व समाजात शिक्षण आणि शिक्षक यांचा दर्जा ढसळत चालला आहे. समाजपरिवर्तनामुळे आजच्या काळात शिक्षकांची ती वृत्ती राहिली नाही. आज ज्ञानार्जनाबरोबर अर्थाजन ही महत्वाचे ठरले आहे. आजच्या समाजात शिक्षक-ज्ञानदानापेक्षा पैशाला महत्व देवू लागला आहे. त्यामुळे समाजाचा

शिक्षणावरच विश्वास राहिलेला नाही. त्यामुळे शिक्षकाची समाजामध्ये प्रतिष्ठा कमी झाली आहे.

आजच्या शिक्षकांची प्रतिष्ठा कमी का झाली ? तर आजच्या शिक्षकाच्या अंगी ध्येयवाद, ज्ञानलालसा, विद्यार्थ्यांबद्दल प्रेम, चारित्र्य संपन्नता, समान वागणूक, सहानुभूती इ. गोष्टी पूर्णपणे नाहीशा झाल्या आहेत. प्रतिष्ठा ही सत्ता, मानाचे स्थान व पैसा यावर अवलंबून आहे. एखादा श्रीमंत कितीही मुर्ख असला तरी त्याचा शब्द प्रमाण ठरतो. व शिक्षक कितीही विद्वान असला तरी त्याचे कोणी ऐकत नाही अशा अनेक कारणामुळे शिक्षकाची प्रतिष्ठा कमी झाली आहे.

आजच्या समाजात शिक्षकांची प्रतिष्ठा कमी असली तरी शिक्षकाचे समाजासाठी असलेले महत्व नाकारता येत नाही. समाजात त्याला प्रतिष्ठा मिळवावयाची असेल तर शिक्षक सर्वोतोपरी आदर्श हवा, कर्तव्यदक्ष हवा, स्वयंशिस्तीचा हवा, समाजात बांधिलकी मानणारा हवा, तरच त्याला प्रतिष्ठा मिळेल !

• • •

## आपणाला माहित आहे का ?

- ❊ भारताचे भौगोलिक क्षेत्रफळ - ३२,८७,२६३ चौ. कि. मी.
- ❊ भारतात शिक्षणाचे सर्वात कमी प्रमाण अनुसूचित जमाती या समाज गटात आहे.
- ❊ पुरुषांचे संख्येपेक्षा स्त्रियांची संख्या जास्त असणारे राज्य - केरळ.
- ❊ मध्यप्रदेशाला भारतातील 'वाघांचे राज्य' म्हणून गणले जाते.
- ❊ भारतातील सर्वात प्राचीन पर्वत रांग - अरवली.
- ❊ ग्रामीण भागातील जनतेचे शहराकडे होणाऱ्या स्थलांतराला 'पॉप्युलेशन बॉंब' म्हणतात.
- ❊ भारतातील सर्वात मोठी जमात - संथाल.
- ❊ भारतात सिमेंटचा पहिला कारखाना मद्रास येथे सुरु झाला.
- ❊ भारतात राजस्थानातील भिलवाडा या जिल्ह्यात चांदीचे उत्पादन होते.
- ❊ भारतात नैसर्गीक वायूचे सुमारे ७०० अब्ज घन मीटर एवढे साठे आहेत.
- ❊ भारतातील ६० % व्यापारी उर्जा निव्वळ दगडी कोळस्यापासून प्राप्त केली जाते.
- ❊ भारतातील राज्यांची एकूण संख्या -२५.
- ❊ मँगेनीजच्या उत्पादनात महाराष्ट्राचा भारतात पहिला क्रमांक लागतो.
- ❊ भारतातील पहिले साक्षर राज्य - केरळ.
- ❊ बांगला देश, नेपाळ व भूतान या देशांच्या तीन बाजू भारतीय सीमेशी मिळालेल्या आहेत.
- ❊ भारतातील सर्वात जास्त नागरीकरण असलेले घटकराज्य - महाराष्ट्र.

# आजचा युवक आणि बदलती परिस्थिती

सागर खद्रे बी. ए. २

**युवक हे देशाचे आधारस्तंभ . युवाशक्तीकडून समाज कसा बदलायला हवा. बिघडत चाललेल्या समाजाची घडी बदलायची असेल तर युवकांनी सक्रिय व्हायला हवे.....बदलत्या परिस्थितीत, युवकांनी करावयाची भूमिका व्यक्त करणारा लेख.............**

आपल्या देशाच्या इतिहास जागृत क्रांतीकारी घडविण्यासाठी युवा शक्तीचा फार मोठा मोलाचा वाटा आहे, देशाची युवा शक्ती सज्ञान, क्रांतीकारी आणि पुढारलेली असेल तर तो देश नहमी प्रगतीपथावर असतो, पण आजच्या युवकाकडे अपेक्षेने पहाता तो उपेक्षाच पदरात टाकतो. मग प्रश्न पडतो, बदलत्या परिस्थितीचा आणि आजच्या युवकाची भूमिका काय आहे ?

युवक कुणाला म्हणायचे ? ज्याच्या शब्दांना शस्त्राची धार आहे. त्याला युवक म्हणायचे, नवीन जग निर्माण करण्याची ओढ असते पण असे युवक बदलत्या परिस्थितीत सापडतात का? समाजाने पार पाडण्यासाठी त्या भूमिका दिल्या आहेत. त्या ते पार पाडतात का? या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला नकारार्थी मिळतील.

आजचा युवक तरुण ऐन तारुण्यात अंमली पदार्थाच्या व्यसनाचा सहारा घेतात. त्यामुळे तो अंमली पदार्थाचा सहारा घेऊन आपले हातपाय झपाट्याने पसरत आहेत. आणि सारा तरुण वर्ग आतून बाहेरुन पोखरत चालला आहे. शहरी युवकापासून ते ग्रामीण युवकापर्यंत गुटखा खाणे हे एक व्यसन सुरु झाले आहे. गुटखा खाऊन आपण आपल्या व्यसनाची सुरुवात करत आहेत पण गुटखा खाता खाता आपले आयुष्य गुटखा होऊन जीवनाचा शेवट करुन घेऊ नये असे मला सांगावेसे वाटते.

आजच्या युवकांच्यावर पाश्चात्य संस्कृतीचा मोठ्या प्रमाणात प्रभाव पडलेला आहे. त्यामुळे आजचा युवक हा पाश्चात्य संस्कृतीच्या पध्दतीने वागत आहे. आपले राहणीमान, पोषाख, आचार-विचार, बोलणे-चालणे यात आजच्या युवकाने फार मोठ्या प्रमाणात बदल केला आहे. पाश्चात्य संस्कृतीमुळे आजचे युवक एकतर्फी प्रेम करणे, अंमली पदार्थाच्या आहारी जाणे. इत्यादी गोष्टी करतो, अगर आपल्या प्रेमाला आपल्या प्रेयसीने प्रतिसाद दिला नाहीतर तो मागेपुढे न बघता आपल्या प्रेयसीचा खून करतो, येथेपर्यंत आजचा युवक पाश्चात्य संस्कृतीमुळे पोहचला आहे. त्यामुळे आजचा युवक हा पाश्चाती करणामुळे नष्ट होत चालला आहे.

बदलत्या परिस्थितीचा विचार न करता आजचा युवक अन्य मार्गाने चालला आहे. याला कारण म्हणजे सध्याचे राजकारण आणि समाज हे घटक आहेत. युवक हा एक समाजाचा घटक आहे. तर राजकारण हे समाजाचे अविभाज्य घटक आहे. राजकारणी लोक आजच्या युवकांचा मोठ्या प्रमाणात आपल्या स्वार्थासाठी उपयोग करुन घेतात. याला कारण सुशिक्षित बेकारी. त्यामुळे आजचे युवक बळी पडताना दिसत आहेत.

आजच्या युवकामध्ये सिनेमाने सर्व बदल घडवून आणले आहेत. प्रत्येक युवक हा सिनेमातील हिरोप्रमाणे फॅशन करायला लागला

आहे. त्यामुळे तो वाया जात आहे. आजच्या युवकांनी आपल्या घराचा सिनेमा केल्याचे चित्र आपल्याला घराघरात दिसून येते.

आजच्या या जगाच्या स्पर्धेत जर टिकायचे असेल तर प्रत्येक युवकाने बदलत्या परिस्थितीचा, बदलत्या जगाचा, आपल्या देशाचा आणि स्वत:चा विचार करणे महत्वाचे आहे.

यापुढे जर जगात जायचे असेल जर आजच्या युवकाने आपल्या आयुष्याच्या परिस्थितीचा विचार करणे गरजेचे आहे. अशा प्रकारे सर्व युवकांनी एकोप्याने बदलत्या परिस्थितीनुसार वागायला हवे. यातच आपल्या देशाची प्रगती अवलंबून आहे.

• • •

# हार्दिक अभिनंदन

ग्रंथ हा मानवी जीवनाचा आधार. ग्रंथ वाढ म्हणजे ज्ञानवृध्दी. सन ९८-९९ मधील सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनींनी आपली वार्षिक अंकासाठी दिलेली रक्कम महाविद्यालयाचे ग्रंथ भांडार समृध्द करण्यासाठी देऊ केली त्याबद्दल त्यांचे आणि या कामी मोलाचे सहकार्य करणाऱ्या या वर्षीच्या विद्यार्थी परिषदेतील खालील सदस्यांचे

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कु. पाटील सविता विलास | बी. ए. २ | विद्यापीठ प्रतिनिधी |
| २) | श्री. वाईंगडे दिगंबर संतु | बी. ए. १ | वर्गप्रतिनिधी |
| ३) | श्री. खोत सुरेश शंकर | बी. ए. २ | वर्गप्रतिनिधी |
| ४) | श्री. पाटील विष्णू पांडूरंग | बी. ए. ३ | वर्गप्रतिनिधी |
| ५) | श्री. देवेकर दिपक यशवंत | बी. एस्सी. १ | वर्गप्रतिनिधी |
| ६) | कु. तंवद कविता मलाप्पा | बी.एस्सी. २ | वर्गप्रतिनिधी |
| ७) | कु. पाटील सारिका तुकाराम | बी. एस्सी. ३ | वर्गप्रतिनिधी |
| ८) | श्री. पाटील जगदिश मारुती | बी. ए. २ | एन. एस. एस. प्रतिनिधी |
| ९) | श्री. चौगले रामचंद्र अनंत | बी. ए. १ | क्रीडा प्रतिनिधी |
| १०) | कु. वरगे मनिषा यशवंत | बी. ए. ३ | विद्यार्थीनी प्रतिनिधी |
| १०) | कु. पाटील स्वाती विश्वासराव | बी. एस्सी. २ | विद्यार्थीनी प्रतिनिधी |

## हार्दिक अभिनंदन !

प्राचार्य
व
संपादक मंडळ (सन १९९८-९९)

# निशाण-ए-कारगील

मानसिंग सावळे बी. एस्सी १

**युध्द म्हटले की दिसतो रक्तपात आणि आर्थिक डबघाई. इराक सारखे राष्ट्रही अमेरिकेबरोबर युध्द करते. भारत आणि पाक यांच्यात नजिकच्या काळात झालेला 'कारगील संघर्ष ' ही काही युध्दाची उदाहरणे लक्षात घेतली की युध्दे ही हवीच का ? हा समाजमनाला पडणारा प्रश्न? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा मोठा प्रयत्न या लेखात व्यक्त केला आहे ......**

''भारत -पाक पडोसी
साथ साथ रहना है ।
प्यार करे या वार करे
दोनो को ही सहना है ।
खून एकसा बहना है....
हम जंग न होने देंगे ''

पाकिस्तानचे पंतप्रधान नवाज शरीफ यांनी भारतीय पंतप्रधान वाजपेयी यांच्या या काव्य पंक्तिने आपल्या 'ढोंगी' वक्तृत्वाचा शेवट केला. हाच या मैत्री संबंधातील महत्वाचा पैलू किंवा बिंदू.

गतकालीन ५२ वर्षात या उभय राष्ट्रामध्ये युध्दाचे पडघम वाजत होते. शाब्दीक चकमकी, आणि सिमेवरील गोळीबार, दहशतवाद्यांचे हल्ले व रक्ताचे पाट वाहणे या पलिकडे भारत-पाक संबंधात फारसे नवे असे काहीच आढळत नव्हते. पाकमध्ये एके-४७ च्या तालावर दहशतवादी संघटना बोलत असतात, पण राजकीय इच्छा असेल तर मार्ग सापडतो या युक्तिप्रमाणे अमेरिका वा चीनच्या दडपणामुळे का होईना उभय देशाच्या पंतप्रधानांनी चर्चा सुरु केली. पण, ही चर्चा सामान्यांच्या गळी कशी उतरणार? कारण गेली ५० वर्षे एकमेकांना सैतानाच्या रुपात दाखवले गेले होते त्याला मैत्रीचे रुप कसे येणार ? लाहोर बस यात्रेचे निमित्त करुन उभय राष्ट्रांत एक उत्साही वातावरण निर्माण करण्यात आले. सामान्य माणसात हा मैत्रिसंबंध पोहोचविण्यासाठी, देव आनंद, शत्रुघ्न सिन्हापासून , कपिलदेवपर्यंतच्या लोकप्रियतेची कास धरण्यात आली अन् लाहोर करारावर या अण्वस्त्रधारी राष्ट्रांनी स्वाक्षरी केली.

अखेर दिल्ली-लाहोर बस भारतीय सिमेमध्ये पोहचते-न-पोहचते, अन् लाहोर कराराची शाई वाळते न वाळते तोच भारताच्या पाठीत पाकिस्तानने खंजिर खुपसला. लाहोरची हीच बस 'कारगील' ला जाईल हे कुणीही स्वप्नातदेखील पाहिले नव्हते. भारताने पाकिस्ताकडे मैत्रीचा हात पुढे केला. परंतु त्या हातावर त्यांनी विश्वासघाताचे निखारे ठेवले या निखाऱ्यांनी झालेली जखम भरुन येण्यासाठी अनेक वर्षे जावी लागतील.

मंदगती संघर्ष (Low Indendity Confict)आणि अणुयुध्द ही (Nwclear Warfare) ही आधुनिक युध्दशास्त्राच्या लंबकाची दोन टोकं. त्यांचा मध्यबिंदू म्हणजे 'पारंपारिक युध्द'. कोणत्याही सबळ व सक्षम राष्ट्राच्या युध्दानीतीमध्ये या तीन पैलूंचा समावेश असणे हे अत्यंत आवश्यक आहे. त्याचा उपयोगही चढत्या मोजणीच्या क्रमातच करणे ही युध्दाची रणनीती होय. म्हणजे संघर्षाची सुरुवात सर्वप्रथम मंदगतीने करायची. जेणेकरुन कमीत कमी रणबळ वापरुन शत्रूची जास्तीत जास्त सेना गुंतवून ठेवायची . 'सोनाराच्या हातोडीने काम होते तिथे, लोहाराचा घण वापरायची काय गरज'

ही या भागची तात्विक भूमिका. 'सुन झू' या चिनी युध्दशास्त्रज्ञाने १००० वर्षापूर्वी लिहून ठेवलेल्या युध्दतत्वज्ञानाचा हा गाभारा व याच गाभारच्याचा उपयोग करुन पाकिस्तानने अफगाणिस्तानातील भाडोत्री व प्रशिक्षित अतिरेकी भारतामध्ये पाठवले व पाकिस्तानी सेनेने त्यांना पाठबळ पुरवले.

जन्मापासून आपल्या सुस्पष्ट अस्तित्वाच्या शोधात असलेल्या पाकिस्तानला आपल्या बलाढ्य शेजाऱ्यांच्या 'जेष्ठ बंधू' भावनेची 'जरब बसली आहे. राजकीय अस्थिरता, हुकूमशाही, धर्मयुध्द अशा अनेक व्याधींनी ग्रासलेल्या या छोट्या देशाने आपली 'अस्मिता' अबाधित ठेवण्याचा एकचं मार्ग शोधला आहे, तो म्हणजे भारताशी सतत सैनिकी संघर्ष. तिथे युध्दात दारुण पराभव होवूनही शतकाच्या आठव्या दशकात मंदगती संघर्ष युध्दनीतीचा रणनीती अवलंबिण्याचा पाकिस्तान सैन्याच्या सर्वोत्तम विचारयंत्रणेने (Think Tank)निर्णय घेतला. या युध्दनीतीची अनेकदा फलश्रुती पहायला मिळते. खलिस्तानी दहशतवाद्यांना दिलेली मदत, काश्मिरमध्ये 'आझादी' मंत्र देवून पेटवलेला वणवा व त्यासाठी भाडोत्री दहशतवाद्यांचे सहाय्य आणि ईशान्य भागातील फुटीर वृत्तीना जेणेकरुन दिलेला मैत्रीचा हात ही रणनितीची वेगवेगळी रुपे .

सद्यस्थितीपर्यंतचा विचार करता पाकिस्तानी सैनिक व दहशतवादी यांचा मुख्य रोख हा 'कुपवाडा' आणि आजूबाजूंच्या प्रदेशात असायचा. साहजिकच या भागातील वाटा अत्यंत निर्णायक स्वरुपाने बंद करण्यात भारतीय सुरक्षा दले खुप प्रमाणात यशस्वी झाली पण, दहशतवादी कारवायांसाठी 'सुप्त' म्हणून ओळखला जाणारा हा भागचं घुसखोरांनी का निवडला याचे चिंतन आवश्यक आहे.

श्रीनगरच्या पूर्वोत्तर विभागातील द्रास-कारगीलपासून काराकोरम पर्यंतचा भाग हा जगातील अत्यंत दुर्गम भाग समजला जातो. १२००० ते २२००० फुटापर्यंतचे उंच डोंगर हिवाळ्यात पडणारा तीस-तीस फुट बर्फ आणि कडाक्याची थंडी या निसर्गाच्या देणग्या या प्रदेशाला लाभली आहे. हा भाग लडाखा परिसरात येतो. द्रास भाग कारगीलच्या पश्चिमेला १० हजार फुटावरील एका दरीत वसला आहे. येथे प्राणवायूचा पुरवठा विरळ होत जातो व वाईट हवामान हे इथले कायमचे वैशिष्ट्य आहे. भारताचा इतिहास तपासून पाहिला तर, कारगीलचा उल्लेख स्पष्टपणे आढळत नाही. कारगील हा 'खार' आणि 'खिल' या दोन शब्दांचा मिळून बनलेला हा भाग श्रीनगर, लेह आणि झस्कर महामार्गावर असल्याने महत्वाचा ठरतो. श्रीनगर-लेह महामार्गावर वर्चस्व ठेवायचे असेल तर, कारगीलमधील शिखरे अत्यंत महत्वाची ठरतात. त्यामुळेच या भागातील बर्फाच्छादित पर्वतावर कब्जा मिळविण्याचे प्रयत्न केले.

कारगील खोऱ्यात तसेच अन्यत्र युध्दाच्या वेळी गरज पडल्यास जास्तीत जास्त सैनिकांची व्यवस्था करता यावी म्हणून खंदक तयार केलेले असतात, बंकर्स उभारलेली असतात. कडक हिवाळ्यामध्ये पाकिस्तानी आणि भारतीय तुकड्या दुर्गम सरहद्दीवरील आपली ठिकाणे काही काळासाठी रिकामी करुन थोड्या मागे जातात व हिवाळा संपताच पुन्हा तैनात होतात. गेल्या कित्येक वर्षाचा हा परिपाठ आहे. या काळामध्ये टेहाळणी पथके काम करत असतात व काही आक्षेपार्ह आढळल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांना सूचना करतात. परंतु या वेळची परिस्थिती बदलली व नियोजित कालमानाआधीच बर्फ वितळायला सुरु झाला व पाकिस्तानी घुसखोरांनी द्रास,कारगील,बटालीक विभागामध्ये विस्तृत टापूत सिमारेषा ओलांडून सहा किलोमीटरपर्यंत, उत्तुंग शिखरावर, पाकिस्तानी लष्कराच्या मदतीने ठाणी प्रस्थापित केली. त्यांच्या हाती स्वयंचलित शस्त्रे,

क्षेपणास्त्रे, रडार यंत्रणा, अत्याधुनिक संदेशवहन यंत्रणा सज्ज होती. पाकिस्तानी लष्करी हेलिकॉप्टरने केलेला हा पुरवठा होता. व या धक्कादायी घडामोडीबाबत शासनाला थांगपत्ताही नव्हता. पण, हे तेव्हा समजले जेव्हा ६ मे रोजी गुलूथी जवळच्या वझिर मोहम्मद व गुलमर्ग जवळच्या मोहम्मद दिन या मेंढपाळांनी घुसखोरांची वार्ता आणली व ६ मे रोजी घुसखोरीबाबत कळल्यानंतर प्रथमच कारवाई सुरु झाली.

चार महिने गाफील राहिल्यावर पाकिस्तानी घुसखोरी निपटून काढण्यासाठी भारताने 'मे' च्या प्रारंभी लष्करी कारवाई सुरु केली त्यातून प्रगती साधणे अशक्य असल्याचे स्पष्ट झाल्याने २६ मे रोजी हवाई हल्ले सुरु केले. हवाई हल्ले करुन ठाणी नष्ट करणे, रसद तोडणे त्याचप्रमाणे त्या भागाची छायाचित्रे घेवून आगानी लक्ष्याचा ठाव घेणे असे प्रयत्न सुरु केले. भारतीय जवानांना घुसखोरांना परतवून लावण्यासाठी इंच इंच प्रगतीसाठी मोठे बलिदान द्यावे लागले. 'ऑपरेशन विजय' च्या मुळ योजनेत अमुलाग्र बदल करण्यात आला. हवाईदल, तोफखाना (बोफर्स तोफा) आणि भूदल यांची सांगड घालण्यात आली. विमानातून होणारे हल्ले आणि बोफोर्स तोफांचे 'टारगेट' वर अचूक पडणारे गोळे यांच्या माऱ्याचे छत्र घेवून जवानांनी खऱ्या अर्थाने 'ऑपरेशनची' सुरुवात केली. इथे यावेळी मात्र इतिहासाची पुनरावृत्ती न करता खऱ्याखुऱ्या नेतृत्वाची झलक आढळून आली.

घुसखोरांनी एकूण ४० ठाणी उंचावर तयार केली होती. त्या ठाण्यांची रचनाच अशी होती की, विमानातून अचूक मारा करता येणे शक्य होते पण, या ठाण्यावरुन पायथ्याजवळ असलेल्या भारतीय सैन्यावर अचूक मारा करता येत होता. त्यामुळे सैनिकांची हानी सुरु होती व हे गांभीर्य लक्षात येताच सेनानींनी रात्रीच्या अंधारात हल्ले सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रथमच इथे गनिमी काव्याचा उपयोग करण्यात आला. शत्रूला तोफखा-न्याने चकवायचे आणि जवानांनी पुढे पुढे जायचे हे तंत्र अवलंबले गेले. फक्त तोफ असून चालत नाही तर, त्याच्या साथीला हवाईच असाव लागतात हे सिध्द झाले. अत्यंत अवघड अशा स्थिती ठाणी सर केल्यामुळे आणि ५०० घुसखोर ठार झाल्याने घुसखोरांचे मनोधैर्य खचले व पाक पंतप्रधान तसेच लष्कर प्रमुखांची हवा गेली. व भारताचा विजय निश्चित झाला. सुयोग्य व्यूहरचना, उत्तम सांघिक नेतृत्व आणि सैनिकांचे अतुलनीय शौर्य हेचं भारतीय विजयश्रीचे द्योतक होय.

भारतीय जनमानसाला युध्दाचे नेमके चटके नसल्यामुळे युध्दखोरीची भाषा सहज ओठावर येते आणि शांततावाद्यांची हेटाळणी केली जाते, पण युध्दातून प्रश्न सुटण्याऐवजी ते अधिकच गंभीर बनतात. आणि शिवाय देशाची अर्थव्यवस्था डबघाईला येवून सामान्य जनतेच्या हालअपेष्टा प्रचंड वाढतात. हाचं आजवचा युध्दखोरीचा अनुभव आहे..... मग ते 'नाझी' हिटलरने लादलेले महायुध्द असो, अमेरिकेने व्हिएतनामाविरुध्द लादलेले कम्युनिझमविरोधी युध्द असो, नाहीतर १९८०-८८ मधील प्रदीर्घ इराण -इराक युध्द असो... भारताला आक्रमक पावले टाकता येत नव्हती. कारण पाकिस्तानच्या घुसखोरांची रसद व दारुगोळा पुरवठा तोडण्यासाठी सिमारेषा ओलांडली तर ते पाकिस्तानच्या पथ्यावर पडेल. ताबारेशा ओलांडल्यावर भारताच्या आक्रमणाविरुध्द भारताच्या आक्रमणाविरुध्द ओरड करुन काश्मिर प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघापुढे नेणे पाकिस्तानला शक्य होईल व भारताचे देखील तेचं स्वरुप होईल जे. अमेरिकेच्या हस्तक्षेपाने अनानुरुप युगोस्लाव्हियाचे झाले. या वास्तवाचे भान ठेवून, सिमावाद चिघळू नये व प्रश्न शक्यतो वाटाघाटीने सोडविण्यासाठी शक्यतो प्रयत्न केले जावेत यासाठी आखिल भारतातल्या जनतेने प्रयत्न करावेत.

तसेच, पाक शासनाच्या दंगलबाजीबाबत, पाकिस्तानी जनता, तेथील क्रिकेट संघ कलाकार आदीशी शत्रूत्व धरु नये विवेक सामंजस्य व सखोल अभ्यास पूर्ण अशी परिपक्व निर्णय प्रक्रिया ही आजची गरज आहे.

'कारगील'मुळे झालेल्या युध्दजन्य परिस्थितीमुळे अर्थव्यवस्थेवर होणारे संभाव्य परिणाम हे भयानक असतात. या परिस्थितीमध्ये प्रतिदिनी ३० ते ३५ कोटी खर्च पडत होता. अणुस्फोटानंतर वाढत गेलेल्या आर्थिक निर्बंधामुळे पाकिस्तानी अर्थव्यवस्था दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आहे. व्यापक युध्द पाकिस्तानला परवडणारे नाही असे अर्थतज्ञ सांगत असले तरी याचा अर्थ असा नव्हे की, भारताची अर्थव्यवस्था भक्कम आहे. भारतालाही तो खर्च परवडण्याजोगा नाही. कारण भारतामध्ये परकीय कर्जाचे राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण २७ % तर पाकिस्तानमध्ये ५२% आहे.

परकीय आक्रमण हे कोणत्याही देशासाठी कळीचं असलं तरीसुध्दा ते परतवून लावल्यानंतर जगण्यातले प्रश्न पुन्हा ऐरणीवर यालला हवेत. सध्या लोकांच्या आशाआकांक्षा आणि राजकीय पक्षांच्या इच्छांचा मेळ कुठेच बसत नाही. युध्दासकट सर्वच गोष्टीचे भांडवल करुन मते मिळविण्याकडे सर्वाचे लक्ष असते. पक्ष हे निव्वळ राजकीय सत्तेचं आणि संपत्तीचं साधन बनू पहात आहेत. देश अनेक गंभीर प्रश्नांनी ग्रासलेला असताना आणि राजकीय अव्यवस्था आणि अस्थिरता यांनी गांजलेला असताना, आपल्या पक्षांना प्रचाराचे मुद्दे शोधावे लागतात. ही आपली शोकांतिकाचं म्हणावी लागेल. महाराष्ट्रात १९९५ ला भा. ज. पा.-शिवसेना युतीनं या प्रश्नांना हात घातला त्यामुळे लोकांनी त्यांना भरभरुन मतं दिली याचा अर्थ, लोकांच्या प्रश्नाबाबत राजकीय पक्षांना आस्था असेल तर, लोक त्या पक्षाच्या पाठीशी उभे रहातात. आता १९६२ मध्ये आपल्याला चीनशी लढावे लागले. हे युध्द फार काळ चालले नाही. पण ते मानहानीकारक ठरले, अर्थात युध्दात भारत नेहमीच एकसंघ व मजबूत असल्याचा प्रत्यय येत गेला. गेली काही वर्षे देशात राजकीय अस्थैर्यामुळे ही मरगळ निघून गेली. अन् राष्ट्रीयत्वाची भावना उचंबळून आली. भारतात खऱ्या अर्थाने अनेकतेत एकता आहे हे याप्रसंगी जगाला दिसले.

'' ए मेरे वतन के लोगो
जरा ऑख मे भर लो पानी
जो शहीद हुए है उनकी
जरा याद करो कुर्बानी।

या कवी प्रदीप यांच्या गीतामुळे भारतातील राष्ट्रीय एकात्मतेला अधिकचं दुजोरा मिळाला आहे. धारातीर्थी पडलेल्या अनेक जवानांना नमन करुन, त्यांच्या आप्तस्वकीयांच्या दु:खात सामिल होऊन तसेच सिमेवर लढणाऱ्या जवानांच्या धैर्याची प्रशंसा केली. सर्व जाती धर्मातील लोक एक होऊन तन-मन आणि धन याद्वारे भारतमातेच्या संरक्षणास कटीबध्द असल्याचे जाणवत आहे. भारतमातेच्या वीर सुपुत्रांनी मातृमूमीच्या संरक्षणासाठी आपले बलिदान केले त्यांचे बलिदान व्यर्थ जाऊ न देता त्यांच्या पराक्रमास हा देश नेहमी आदराने झुकेल. आमचा भारत देश एक आहे. आणि त्याची शान - मान यातच आमचा गौरव आहे. त्याची एकता आणि अखंडता आमचा प्राण आज साऱ्या हिंदुस्थानातून एकच लहरी उठत आहेत.

'' विजयी विश्व तिरंगा प्यारा
झंडा उंचा रहे हमारा ! ''

• • •

# ॥ ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी ॥

ज्योतीराम पाटील बी. ए. ३

**ज्ञानेश्वरी ही अभिजात कलाकृती संत ज्ञानेश्वरांनी १३ व्या शतकात संस्कृत भाषेचा पायंडा मोडून प्राकृतजनांना आध्यात्मिक उन्नतीचा अधिकार सामान्यासही आहे हे ज्ञानेश्वरीच्या आधारेच शिकविले. आठ शतके संपली तरी ज्ञानेश्वरीचे अमोघपण अजून ओले आहे.**

ज्ञानेश्वरी हा ग्रंथ मराठी वाङ:मयात सर्वश्रेष्ठ मानला गेला आहे. अनेक पंडितांना व महाराष्ट्रातील मराठी मनाच्या लोकांना या ग्रंथाने आकर्षित केले आहे. अव्याहत आनंद, ज्ञानेश्वरीने समाजाला दिला. सजीवन समाधीनंतरही ज्ञानदेवानी एकप्रकारे आपले अमरत्व सिध्द केले आहे. ज्ञानेश्वरी मध्ये जे काही ज्ञानेश्वरांनी विचार, आचार, विचार सौंदर्य लिहून ठेवलेले आहे ते आजही म्हणजे काही सेकंदापूर्वी उमटलेल्या मोहक फुलासारखी प्रसन्नता, ताजेपणा, सुखद अनुभव ज्ञानेश्वरीच्या ओवीत ओवी मध्ये जाणवतो.

अशा या ईश्वरी ज्ञानाचे लेखन ७०० वर्षापूर्वी महाराष्ट्रमध्ये पैठण जवळील आपेगावात जन्म झालेल्या एका विठ्ठलपंथी वडील असणाऱ्या ज्ञानेश्वर नावाच्या महान तत्वज्ञाने लेखन केले. ज्ञानेश्वराचा जन्म शके ११९७ मध्ये झाला. समाजाने त्यांना जी विकट, वाईट प्रकारची शिकवण दिली त्यावेळी लक्षात आले की आपण एका उच्चकुलात जन्माला आलो म्हणून जर आपल्याला त्रास सहन करावा लागत असेल तर सर्वसामान्य कुटुंबात जन्माला आलेल्या एका असाह्य व्यक्तिला किती त्रास सहन करावा लागत असेल. हा एक मुख्य उद्देश आपल्यासमोर ठेवून व दुसरा म्हणजे, समाजामध्ये जे काही अंधश्रध्देच्या नावाखाली देवपूजा चालली होती व उच्चकुलीत ब्राम्हण समाजाला एका नव्या पध्दतीने लुटत होते हे दुसरे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेऊन शके १२१२ मध्ये भगवान श्री कृष्णाने अर्जुनास सांगितलेल्या भगवतगीतेचा आधार घेऊन साक्षात श्रीकृष्ण होऊनच भगवतगीतेवर टीका करुन साक्षात ईश्वरी ज्ञानाचे लेखन ज्ञानेश्वरी मध्ये ज्ञानदेवांनी केले.

मराठी माणसाच्या मनाला गेली ७०० वर्षे मोहिनी घालून राहिलेल्या असामान्य ''ज्ञानदेवी'' या ग्रंथराजाला समजावून घ्यावयाचे म्हटले तर त्याचे अंतरंग समजावून घ्यायला हवे. ज्ञानदेवांनी आपल्या समोर महाभारतातील एक महत्वाचा अध्याय, गीता हा कुरुक्षेत्रावर झालेला श्रीकृष्ण-अर्जुन हृदय संवाद ठेवला. हा हृदय संवाद म्हणजे साक्षात देवाचा संदेश आहे. भारतीय संस्कृतीचे सारसर्वस्व आहे ते जाणून घेणे प्रत्येक भारतीयास व कमीत कमी प्रत्येक महाराष्ट्रीयन नागरिकास आवश्यक आहे. मराठी माणसाचे मन ओळखून ज्ञानेश्वरांनी आपले अद्वैत तत्वज्ञान मायमराठी भाषेतून सर्वसामान्य जनतेस समजेल अशा भाषेत सहजप्रकारे उपलब्ध करुन दिले. परंतु असे हे ज्ञान या युगात आपल्या अंत्यत जवळ असून देखील कोणी समजावून घेऊ शकत नाही. त्यांची एका गोचीडा सारखी अवस्था झालेली आहे.

पाहे पा दुध पवित्र आणि गोड।<br>
पासी त्वचेचिया पदराआड ॥<br>
परि ते अव्हेसनि गोचिड।<br>
अशुध्द का न सेवती ॥

(ज्ञानेश्वरी अ. ९ ओ. ५७)

अशा प्रकारे गोचिडाला दुध न आवडता रक्तच आवडते. सध्ययुगीन मानवाला या ईश्वरी ज्ञानापेक्षा नको ते ज्ञान आवडते आहे.

'ज्ञानेश्वरी' हा गीतेवरील टीका ग्रंथ आहे हे तितकेच खर आहे. पण ते गीतेचे प्रतिपद्य भाष्य नाही. तर ते गीतेचे भावार्थ कथन आहे. गीता (भगवतगीता) जी भगवान श्रीकृष्णाच्या तोंडून एखाद्या पुष्प कमलासारखी किंवा सरस्वतीच्या हातून जसे ज्ञान बाहेर पडले तशी ही गीता जनसामान्यांना काय सांगते हे स्पष्ट करण्यासाठी ज्ञानदेव आपल्या प्रतिभेचा अविष्कार करतात. गीतेच्या सातशे श्लोकांच्या नऊहजार ओव्यामध्ये केलेला विस्तार जाणीवपूर्वक आहे. मूळ गीतेत प्राधान्याने कृष्ण आणि अर्जुन आहेत . संजय आणि धृतराष्ट्रही आहेत. ज्ञानेश्वरांनी यात आणखी दोन भरी घातल्या आहेत. एक म्हणजे ते स्वत: आणि दुसरे म्हणजे श्रोते, ज्ञानेश्वर ही या साऱ्यांची कथा आहे म्हणून ज्ञानेश्वरांनी ही गीता टीका कथा रुपात श्रोत्यांना सांगितली.

ज्ञानेश्वराची कथेच्या विवरण्याची (सांगण्याची) पध्दती अतिशय सोपी व प्रभावी आहे. सर्वसामान्य माणसाशी सहज संवंध साधता यावा अशी आहे. कृष्णाच्या ज्ञानाचा अनुभव अर्जुन कसा घेतो याचे समर्पक वर्णन ज्ञानेश्वरांनी येथे केले आहे. इथे ज्ञानेश्वरीचा वाचक कृष्णार्जुनाच्या संवादातील अनुभव घेत नाही तर कृष्ण गीतेच्या माध्यमातून अर्जुन कोणते तत्व समजावून देत आहे. याचा अनुभव घेतो. समाजात या अनुभवामुळे जाती जमातीतील नेतृत्वाला ओवीच्या विचारानी ज्ञानाची, समतेची बैठक मिळाली त्यांना जीवनात आनंद मिळाला ज्याना ही ज्ञानेश्वराची दिशा समजली नाही ते रानोमाळ हिंडत आहेत. आणि ते केवळ शब्दार्थाच्या अंगाने चालत आहेत.

१३ व्या शतकात महाराष्ट्रामध्ये जनसामान्य किंवा सामान्य वर्ग देवदेवतांच्या भजन-पूजनात, उपास-तापास व नवरा सायासात बुडाला होता, तंत्र-मंत्र-भूत-पिशाच्य व ताण मारणात अनेकांचा वेळ चालला होता. जनसामान्यांच्या मनाला आत्मिक शांती नव्हती. समाज कामक्रोधीत झाला होता. तर दुसऱ्या बाजुस कर्मठवृत्ती, वर्णभेद, यामुळे समाजमनाचा विकास थांबला होता. समाज क्षुद्र देवदेवतांच्या आधीन झाल्यामुळे अनाचार, वामाचार, अंधश्रध्दा इत्यादी वाढले होते. अध:पतन होत चालले होते. या पार्श्वमूमीवर विशुध्द विचाराचा व ज्ञानाचा प्रचार व प्रसार करणे गरजेचे होते. ज्ञानेश्वरी हा जो ज्ञानेश्वरीचा प्रचार केला तो पैठणीच्या पंडितासमोर नाही तर नेवाशासारख्या प्राचीन काळच्या तीर्थस्थानी.

ज्ञानेश्वरी वाचताना साक्षात ज्ञानेश्वरच सांगत आहेत असे वाटते, मनाला आनंद, सुख, शांती व दुसऱ्या बद्दल प्रेमाची भावना निर्माण होते. असे सुंदर ज्ञान. येथून पुढच्या काळात एखाद्या फुलाच्या पाकळ्या जशा हळूवार हळूवार उमलतात तसे हे ज्ञान महाराष्ट्रात उमलत राहील व एंके दिवशी महाराष्ट्र ही पवित्र भूमी मथुरा नगरी होऊन सुखाने व शांततेने आपला जीवनक्रम चालू ठेवील ज्ञानेश्वरी हा ग्रंथ जसे

पुढती पुढती पुढती । हा ग्रंथ पुष्प संपत्ती ।
सर्व सुखी सर्वाभुती । संपूर्ण होइजो ॥
(ज्ञा. अ. १८ ओ. १८०९)

ज्ञानेश्वराचे म्हणणे आहे की, आपल्या ग्रंथाच्या पुष्परुपी संपत्तीने विश्वातील सर्व प्राणीमात्र सर्व प्रकारच्या सुख संतोषाने परिपूर्ण होऊन जावेत अशी ज्ञानदेवाची मनोकामना येथे व्यक्त झाली आहे.

असे हे ईश्वरी ज्ञान म्हणजेच साक्षात ज्ञानेश्वरी होय.

• • •

# प्रेम : अनेक अर्थ

सापेक्ष आणि निरपेक्ष या प्रेम या संकल्पनेच्या दोन बाजू. मानवी जीवनात आढळणाऱ्या प्रेमाची शोकांतिका, प्रेम या कल्पनेचे अंतिम सत्य काय ? याची योग्य बाजू कोणती ? व अयोग्य कोणती? त्याचा अंत ........... या विविध बाजू आमच्या काही विद्यार्थ्यांनी शोधल्या आहेत. त्या एकत्रितपणे प्रसिध्द करत आहोत.

## १. प्रेमाची शोकांतिका

हिंदुराव खोत बी. ए. भाग १

'प्रेम' हा अडीच अक्षरी शब्द उच्चारताच कित्येक कवींनी लिहिलेली प्रेमासंबंधातील गाणी ओठावर येऊ लागतात. मन कळी सारखं फुलारुन येतं आणि अंत:करणातला काळजाचा ठोका चुकल्यासारखा वाटतो. आणि मग मनाला एक प्रकारची ओढ लागते. हुर....हुर.....लागते.

'प्रेम' मानवाला मिळालेले एक अपूर्व वरदान आहे. प्रेमाशिवाय मानवी जीवन अर्थपूर्ण होऊच शकत नाही. किंबहुना प्रेम हे मानवी जीवनाचे एक अविभाज्य अंग आहे. 'प्रेम' कुणावरही करावे पण ते सागरा सारखे अथांग असावे ! आई-वडिलांनी मुलावर केलेले प्रेम, बहिणीने -भावावर केलेले प्रेम, पतीने -पत्नीवर केलेले प्रेम, इतकेच नव्हे तर प्रियकराने-प्रेयसीवर केलेले प्रेम, यामुळेचे जीवनात अनेक सुखद घटना घडत असतात. हे 'प्रेम' मानवाला स्वार्थापासून दूर ठेवते, निखळ आनंद देते आणि माणुसकीचे नाते जोडायला लावते. अशा या एकूणच प्रेमाचा विचार केल्यास आजच्या परिस्थितीत प्रियकर व प्रेयेसी यांच्यामधील प्रेमाला अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले आहे.

आजच्या तरुण तरुणींच्या मनामध्ये प्रेमाविषयी प्रचंड उत्सुकता आहे. एखाद्या चांगल्या तरुणावर किंवा तरुणीवर आपणही प्रेम करावं, असे प्रत्येक तरुणीला किंवा तरुणाला वाटत असते. यापैकी कार्हीनी खऱ्या प्रेमाचा अर्थ जाणून घेतलेला असतो. मात्र काहीजण या बाबत अज्ञानी असतात. प्रेम करणे हा काही अपराध नाही. परंतु आज आपल्या समाजामध्ये प्रेमाकडे संशयी नजरेने पाहिले जाते. प्रेम करणे हे अनैतिक कृत्य आहे असे भासवण्याचा प्रयत्न केला जातो. प्रेम करण्याचा अधिकार प्रत्येक तरुण तरुणींना आहे परस्परांच्या उत्कट स्नेहाने आणि जिव्हाळ्याने दोन मने एकत्र येऊन सुखी होणार असतील तर त्यामध्ये अनैतिक असे आहे तरी काय? मात्र आज या प्रेमाच्या विश्वामध्ये एकतर्फी प्रेमाचे प्रमाण प्रचंड वारुळे आहे. आणि ही चिंतेची बाब आहे. एकतर्फी प्रेमाच्या या प्राणघातक प्रवृत्तीमुळे प्रेमाचे पावित्र्यच हळूहळू नष्ट होऊ लागले आहे.

एखादी मुलगी आपल्याला आवडली किंवा तस कुणी सांगितल की तिच्या पाठीमागे लागायचं. सुरुवातीचा प्रेमानं, नंतर रागाने जबरदस्तीने किंवा धमकी देऊन तिच्याकडून होकार मिळवण्याचा प्रयत्न करायचा. इतकेच नव्हे तर तिच्यावर प्राणघातक हल्ला करायचा या चाकोरीतून जाणारे प्रेम हे प्रेम असूच शकत नाही. तिथं असलाच तर एक भ्याड पणा असतो, एक व्यवहार असतो. आणि या दोन गोष्टी प्रेमामध्ये किंवा प्रेमाच्या अखंड विश्वामध्ये राहूच शकत नाही.

प्रेम हे धमक्या देऊन मिळवता येत नसते तर ते अंत:करणातून निर्माण व्हावे लागते आणि हे प्रेम आठवणीवर जगत असते, भावनावर फुलत असते. ते प्रेम असते. 'क्षमाशील धरती' सारखे. सौंदर्याने ते कमी असले तरी मनाने ते अभंग असते. आणि म्हणूनच म्हटले जाते की- 'प्रेम हे सौंदर्याकडे पाहून न करता ते पावित्र्याकडे व व्यक्तिच्या गुणाकडे पाहून करावे !' आणि या पवित्र प्रेमातून निर्माण झालेला हा आधार जीवनात प्रचंड उत्साह निर्माण करतो. या उत्साहातूनच जीवनात काहीतरी भव्य-दिव्य करावेसे वाटते. वासनेपेक्षा- भावनांना महत्व देणारे प्रेम, परस्परांची मनं समजावून घेणारे आणि त्यागाच्या प्रशस्त पायावर उभा राहिलेल प्रेमच शेवट पर्यत टिकू शकते. मात्र या प्रेमाला दोघांचाही तितकाच प्रतिसाद असायला हवा ! एकतर्फी- प्रेमातून चांगले असे काहीच हाती लागत नाही. उलट एकतर्फी प्रेमाचा पराभव हा अटळ असतो, निश्चित असतो. प्रेम हे जबरदस्तीने निर्माण करता येत नाही तर ते दोन्ही अंत: करणातून निर्माण व्हावे लागते.

स्वत:च्या इच्छा दुसऱ्यावर लादणे म्हणजे प्रेम नव्हे. त्यामध्ये प्रेमाची नव्हे तर जबर दस्तीचीच भावना अधिक असते. एकतर्फी-प्रेमातून प्रेमासाठी असणारे जीवन जगता येत नाही. एकतर्फी प्रेमासाठी असणारे जीवन जगता येत नाही. एकतर्फी प्रेमातून सांसारिक क्षणाच्या उत्कटतेचा आस्वाद घेता येत नाही, एकतर्फी प्रेमातून एकमेकांची मने समजावून घेता येत नाहीत. जर हे सर्व कांही मिळवायचे असेल तर दोन्ही मनांचे मिलन व्हावे लागते. दोघांनाही एकमेकांच्या गुणाबरोबर दोषांचाही स्वीकार करावा लागेल. आणि म्हणूनच एकतर्फी-प्रेम हे आजच्या समाजाला लागलेला एक कलंक आहे असे - मी म्हणतो.

मित्रहो आजच्या एकूण परिस्थितीचा विचार केला तर एकतर्फी प्रेमामध्ये एखादं दुसरा अपवाद वगळता तरुणांची संख्या प्रचंड आहे. अर्थात या संबंधी सर्वच दोष हा तरुणांना देणे हे ही चुकीचे ठरेल. कारण तरुणांनी आपल्यामागे यावं, त्यांनी आपल्याला विचाराव असे प्रत्येक तरुणीला वाटत असते. मग अशा प्रकारे संपूर्ण त्या तरुणीच्या आहारी गेलेल्या एखाद्या तरुणाला ती तरुणी अचानक नकार देते. आणि मग पुढे जे नको असतात ते प्रकार घडतात. म्हणून आजच्या भगिनींनी देखील याचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. मात्र अशा प्रकारच्या मुलीचे अपवाद वगळता एकतर्फी-प्रेमात मोठ्या प्रमाणात आजचा तरुणच जबाबदार आहे.

आपल्या मनात असलेली किंवा आपल्याला मनापासून आवडलेली मुलगी आपल्यालाच मिळाली पाहिजे. या भावनेतून हे एकतर्फी प्रेमाचे व्यसन निर्माण झाले आहे. यावेळी असणाऱ्या मुलीच्या भावनांचा विचार करायला हे तरुण तयार नसतात. त्यांना काहीही करुन ती मुलगी हवी असते मग त्यासाठी तिला त्रास देणे, तिला धमक्या देणे या मार्गाचा अवलंब ते करतात. यामध्ये त्यांना खरा पुरुषार्थ वाटत असतो. दुसऱ्याच्या भावना स्वत:च्या स्वार्थापोटी दडपून टाकणे. यामध्ये कोणताही पुरुषार्थ नसून तो भ्याडपणा आहे. मित्रहो, स्वत:ला प्रेमवीर समजणारे हे युवक वडिलांच्या पैशावर मुलींना त्रास देणे, तिला धमकी देणे यातच खरा पुरुषार्थ मानतात. परंतु ज्या मुलीने आपल्याला कधीही त्रास देणे, तिच्यावर जबरदस्ती करणे, तिला धमकी देणे हा मर्दपणा नसून षंढपणा आहे. खरोखरच तुम्हाला पुरुषार्थ गाजवायचा असेल

तर जीवनात अशी अनेक क्षेत्रे तुमची वाट पाहत आहे. त्या ठिकाणी तुम्ही पराक्रम करा. जेणे करुन तुमच्या या पराक्रमाचे सर्वजण कौतुक करतील. तुमच्या या चांगल्या कार्याला समाज कधीही विसरणार नाही. परंतु हाच पराक्रम जर तुम्ही एखाद्या निष्पाप व्यक्तीला त्रास देऊन तिचे जीवन उद्‌ध्वस्त करणार असाल तर मात्र समाज तुम्हाला कधीच क्षमा करणार नाही. या तुमच्या दुष्कृत्यामुळे तुम्ही तर उद्‌ध्वस्त होणार आहातच पण समोरच्या व्यक्तिचे जीवनही उद्‌ध्वस्त करणार आहात.

एखाद्या व्यक्तीवर आपण जेव्हा मनापासून प्रेम करतो तेव्हा त्या विषयी आपल्या मनात आत्यंतिक आदर असायला हवा. आपल्यालाला आवडणारी मुलगी दुःखात रहावी ही गोष्टच खऱ्या प्रियकराला न पटणारी आहे. आपल्याला आवडणारी व्यक्ती फक्त आपल्याला मिळाली तरच ती सुखी होईल हा स्वार्थी दृष्टीकोन खऱ्या प्रेमात नसतो खरं प्रेम हे आपल्याला आवडेलेली ती व्यक्ती कुठेही असली तरी ती सुखी रहावी अशी प्रार्थना करीत असते. त्या व्यक्तिचे दुःख हे प्रेम सहन करु शकत नाही. ज्या प्रेमामध्ये विघातक विचारांचा शिरकाव होतो तेथे प्रेमाच्या पावित्र्याचा शेवट होतो. मग ते प्रेम- प्रेम राहत नाही. कारण खऱ्या प्रेमाचा अर्थच तेथून नष्ट झालेला असतो. दुसऱ्याचं जीवन उद्‌ध्वस्त करणार प्रेम हे आपल्या पवित्र संस्कृतीत कोठेच बसू शकत नाही.

त्यागाच्या आणि समर्पणाच्या भक्कम पायावर उभारलेल्या आपल्या भारतीय संस्कृतीला बदनाम करणारी प्रेमातील ही दुष्ट प्रवृत्ती नष्ट करण्यासाठी आज एका परिवर्तनाच्या क्रांतीची गरज आहे.

मित्रहो ! या एकतर्फी प्रेमाच्या वाढत्या प्रकारामुळेच अनेक मुलींना त्यांचे आईवडील शाळेत किंवा कॉलेजात पाठवावयास तयार नाहीत. अशा प्रकारे तरुणींना शिक्षणापासून वंचित करणारे हे एकतर्फी प्रेम म्हणजे आजच्या प्रेमाची शोकांतिकाच नव्हे काय ?

**जय महाराष्ट्र ! जय हिंद !!**

● ● ●

## २. प्रेम हेच अंतिम सत्य !

**विजय वाईंगडे** बी. एस्सी १

जीवनात सुख-दुःख ही प्रत्येकाच्याच वाट्याला आलटून-पालटून येत असतात. तऱ्हेतऱ्हेची माणसं भेटतात. त्यातून येणारे अनेक बरेवाईट अनुभव कोणीच टाळू शकत नाही. जीवनातील कोणत्याही क्षणी नैराश्य येऊ न देता माणसाने माणसावर प्रेम करावं. मानवी जीवनात प्रेम हेच अंतिम सत्य आहे.

जीवनात आपली इच्छा असो वा नसो अनेक भोग भोगावेच लागतात. शेवटी आयुष्य म्हणजे एक वनवासच! प्रत्येक व्यक्तीला त्या वाटेवरुन जाणं हे अटळ असतं. आयुष्याच्या एखाद्या टप्प्यावर , बघितलेली खटले एकाएकी उद्‌ध्वस्त झाली. एखाद्याची साथ अचानक सुटली तरी मनाचा तोल ढळू देता कामा नये नवनवीन आशा-आकांक्षा त्याला नव्याने आयुष्य जगायला प्रवृत्त करतात. एखादं सुख नियतीने हिरावून घेतलं तरी त्यानंतरही मिळणाऱ्या नव्या सुखाच्या आशेवर उगवलेला प्रत्येक दिवस घालवत असतो. शेवटी मानवी जीवन म्हणजेच प्रेमाचे अंतिम सत्य होय.

कधी काळी अनपेक्षितरीत्या आपलीच माणसं आपल्यापासून दुरावले जातात.

आपल्याच प्रिय व्यक्तिचं प्रेम आपल्याला मिळालं नाही तर होणाऱ्या यातना ह्या प्रचंड असतात. कधी काळी जीवनातल्या सगळ्या पहिल्या-पहिल्या गोष्टीची गोडी वेगळीच असते. पहिलं प्रेम आणि पहिली भेट याची आठवण हृदयात कायम राहते. तसेच रोज हजारो माणसांना आपण पहात असतो, भेटत असतो . पण एखादीच व्यक्ती मनात घर करुन बसते. काळाच्या ओघात आपण साऱ्या व्यक्तीना विसरुन ही जातो. बऱ्याच जणांशी आपली पहिली भेट ही शेवटीचीच ठरते. पण एकच व्यक्ती अशी असते की, जी पहिल्या भेटीतच आवडून जाते. पहिल्या-पहिल्या त्या भेटीनं आयुष्यभराच्या प्रेमाचं बीज रोवलं जातं. अशावेळी एक व्यक्ती पहिल्या भेटीतच हृदय चोरुन नेते. क्षणाच्या भेटीनंतर जीवाला न संपणारी बैचेनी देऊन जाणाऱ्या त्याच्या बद्दल ओढ वाढू लागते. ह्या प्रकारच्या त्या गोष्टी आपण कधीच विसरु शकत नाही. कुणाच्याही आधाराशिवाय आणि प्रेमाशिवाय एकट्याने स्वत:साठीच जगणे अतिशय दु:खदायी कल्पना आहे. आयुष्याच्या अर्ध्या वाटेवर आपल्याच माणसानी आपली साथ सोडली तरी त्याला उदार अंत:करणाने माफ करुन वेळप्रसंगी त्याला साथ द्यायला हवी. आयुष्यभर परस्परांवर प्रेम करावं हे मानवी आयुष्यातील प्रेमातील खरे सत्य होय, असे मी म्हणतो.

मानवी जीवनात सतत प्रचंड उलथापलथ होत असते. सुख-दु:खाच्या अनेक धाग्यांनी मानवी जीवन बनलेले असते. जन्म आहे तसाच मृत्युही प्रत्येकाला अटळ आहे. या अनिश्चित आयुष्यातही एकमेकांच्या साथीने पुढे जायला मिळालेली प्रेरणाच महत्वाची असते. म्हणुनच सांगतो की, मित्रहो या आयुष्यात एकदा तरी प्रेम करावे, नि प्रेम करतच रहावे.................ऽऽ ! म्हणजेच प्रेम हेच अंतिम सत्य होय.

• • •

## ३. प्रेम : योग्य अयोग्य

नामदेव पाटील बी. ए. भाग १

नि:स्वार्थ अंत:करणाने दुसऱ्याच्या अंत:करणाचा ताबा मिळविण्याचा केलेला प्रयत्न म्हणजेच 'प्रेम'. पण प्रत्येकाच्या बघण्याच्या नजरा वेगवेगळ्या. तशाच प्रकारे प्रत्येकाच्या प्रेमाच्या व्याख्या या भिन्न भिन्न कारण 'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती.' पण ज्या ठिकाणी ही प्रेमाची नि:स्वार्थी व्याख्या लागू होत नाही, ते प्रेम नसून असते केवळ लैंगिक पिपासा.

आयुष्यात प्रत्येक व्यक्तीला वाटते की, आपणाला कोणी तर मित्र असावा. आपण दुसऱ्याच्या भावना समजावून घ्याव्यात. आपल्या भावना कोणीतरी समजावून घ्याव्यात, अशा प्रकारच्या विचारांच्या वादळाचे रोप मनात उगवले की त्या रोपांतूनच नंतर प्रेमाचा वृक्ष बहरतो. आज मात्र या प्रेमाचा अर्थच समजावून घेण्याचा कोणी विचार करत नाही. एखादी सुंदर तरुणी दिसली की आजच्या तरुणांचे लगेच त्या तरुणीवर प्रेम बसते. पणे असे का, कोणत्या शास्त्रात लिहिले आहे का? की प्रेमासाठी सुंदर मुलगीच असावी. मग त्या मुलीचा पाठलाग करुन तिला नाहक त्रासून सोडायचे पण याचा विचार कोण करत नाहीकी, त्या मुलीला आपण आवडतो की नाही आणि जर का त्या मुलीने प्रेमास नकार दिला अथवा प्रेम असताना विवाहास नकार दिला तर या परिणामांचा जिवंत अनुभव अजून ताजाच आहे. केवळ मुलीने आपल्या प्रेमास नकार दिला

म्हणून तिच्या आयुष्याचा शेवट व स्वतःच्या मृत्युची घंटा दणाणून घ्यायची. ही कोणती प्रेमाची पायरी नव्हे. तर याला शुध्द लैंगिक वासना असे नांव आहे. दुसऱ्याचे दुःख म्हणजे आपले दुःख, दुसऱ्याच्या सुखात आपले सुख सामावले आहे. मात्र तू माझी नाही झालीस तेव्हा तुला दुसऱ्याची सुध्दा होऊ देणार नाही.

ही केवळ अनिती आहे. मात्र या सर्व घटनेमध्ये केवळ मुलांचा अपराध असतो असे म्हणजे हे अर्धसत्य आहे. कारण टाळी एका हाताने वाजत नाही.

आजच्या तरुण-तरुणींना आवर्जून सांगावेसे वाटते की, तुम्हाला दुसऱ्याच्या जीवनभर अधिकार गाजवण्याचा मुळीच हक्क नाही. तरुणींनी सुध्दा प्रेम करुन ते प्रेम पूर्णपणे तडीस न्यावे. प्रेम करायचे आणि पुन्हा आयुष्यात साथ देण्यास नकार द्यायचे हे योग्य नाही. प्रेम जर द्वितर्फी असेल तर अशा तरुण-तरुणीबाबत आपला काही आरोप नाही. पण नकार मिळाला म्हणून हृदयाचे आयुष्य उजाड करायचे हे अयोग्य. आपले प्रेम हे जर निःस्वार्थी व खरे असेल तर आपला त्रास आपल्या प्रेमाला म्हणजे प्रेमिकेला अजिबात होऊ नये या प्रकारे आपले वागणे असावे. तू माझी झाली नाहीस तेव्हा दुसऱ्याची होऊन तर सुखी रहा. तुझ्या सुखातच माझे सुख सामवले आहे असे मानावे. तिला ठेच लागली तर त्याच्या वेदना आपणास होतात. अशा प्रकारचे प्रेम हे पूर्णपणे सफल नसेल तरी सुध्दा अशा प्रकारच्या प्रेमाची महती शब्दात करणे हे अशक्य!

• • •

## ४. प्रेम

भालचंद्र पोतदार बी. ए. भाग १

'प्रेम' ही एक पवित्र गंगा आहे. या गंगेच्या विस्तृत जलौद्याचे दोन किनारे म्हणजेच सुख आणि दुःख ! त्यातील दुःख हे नेहमीच आपल्या बाजूला ऐलतिरावर असते तर सुख हे पैलतिरावर असते. ज्याला हा सुखाचा किनारा गाठावयाचा असेल तर त्याला संपूर्ण जलौध पार करुन जावा लागतो. त्यासाठी हवी असते- निखळ सोशिकता, निर्भीड आणि बेडर प्रवृत्ति, अथक परिश्रम करण्याची मनोवृत्ति आणि ....आणि.... कुणा जीवलग माणसाची अखंड सोबत ! हे सर्व असूनही तो प्रेम सुखाचा किनारा गाठता येईलच असेही नाही. कारण त्या सर्वांबरोबरच तितकीच आवश्यक असते- नशिबाची साथ !

हे सर्व ज्याला मिळाले तो भाग्यवान तर खराच ! परंतु असे भाग्यवान जगाच्या पाठीवर किती आढळतात ? पाच.....दहा....... पंधरा.... अगदीच मोजके ! हाताच्या बोटावर मोजण्याइतके तरी ........! रोमोओ व ज्युलिएट, लैला व मजनू, बाजीराव व मस्तानी, नल व दमयंती.............

• • •

एक क्षण पुरे प्रेमाचा,<br>
वर्षाव पडो अनंत मरणाचा !

– गोविंदाग्रज

# मानवी जीवनाची शोकांतिका

एस. के. तिकोडे बी. एससी. २

यदा यदाहिं धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अत्भ्युस्थानम् धर्मस्य तदात्मानं सृजाम्हम ॥
परित्राणाय् साधूनां विनाशायच दुष्कृताम् ।
धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे-युगे ॥

भारतीय संस्कृतीचे सारसर्वस्व भगवद्गीतेतून भगवान श्रीकृष्ण सांगतात की, ''हे अर्जुना ! पृथ्वीतलावर जेव्हा जेव्हा धर्माची हानी होते व अधर्माची वृध्दी होते, त्या त्या वेळी संत सज्जनांच्या रक्षणासाठी व दुष्ट-दुर्जनांच्या संहारासाठी त्याचप्रमाणे खऱ्या धर्माच्या स्थापनेसाठी मला युगायुगात अवतार स्वरुपात प्रकट व्हावे लागते.''

वरच्या परिच्छेदात अशा परिस्थितीत म्हणण्याचे कारण असे की, आज मानव जीवनाची शोकांतिका झाली आहे. आज जीवनाचे तत्वज्ञान बदलले आहे.

'' Nearest the city far from the Humanity.''

ह्या इंग्रजी म्हणीप्रमाणे आजची परिस्थिती झाली आहे. मानव आज आधुनिकतेतून, सुधारणेतून जितका शहराजवळ गेला आहे, तितकाच तो मानवतेपासून दूर चालला आहे. अशा प्रकारे तो सुधारुन बिघडला आहे. तो खऱ्या आत्मिक सुखाला सोडून या मिथ्या जगातच आपले जीवन शोधतो आहे. जसे विषातच जीवन शोधण्याप्रमाणे, अमावस्येतच चंद्र शोधण्या-प्रमाणे, वाळवंटातच निर्झर शोधण्याप्रमाणेच मूर्खपणाचे आहे. आज यांत्रयुगाच्या कोलाहलात तो आपले आत्मिक सुख पूर्णपणे हरवून बसला आहे. त्यातच तो सुख शोधण्याचा मूर्खपणा करीत आहे. आज मानव मानवतेपासून दूर गेला आहे, मानवानेच मानवाला एक भीषण अवकळा आणली आहे. महाकवी वर्डस्वर्थने म्हटल्याप्रमाणे

'' Nearest the city far from the Humanity.''

की मानवानेच मानवाला काय बनवले आहे? अशा प्रकारे अज्ञानाच्या, स्वार्थाच्या काटेरी झुडपात अडकून मानवतेची लक्तरे लक्तरे उडाली आहेत. • • •

## आपणाला माहित आहे का ?

- ✲ महाराष्ट्रातील सर्वात मोठी नदी- गोदावरी.
- ✲ कावेरी या नदीस 'दक्षिणगंगा ' असे संबोधतात.
- ✲ भारतातील ब्रम्हपुत्रा ही नदी 'तांबडी नदी ' म्हणून ओळखतात.
- ✲ महाराष्ट्रातील भंडारा या जिल्ह्यात तळ्यांची संख्या जास्त आहे.
- ✲ महाराष्ट्रामध्ये निव्वळ ओलीताचे क्षेत्र - ३२.७२ लाख हेक्टर.
- ✲ नर्मदा ही नदी दक्षिण भारतातील सर्वात लांब पश्चिम वाहिनी नदी आहे.
- ✲ महाराष्ट्रातील सर्वात मोठा कत्तलखाना - देवनार.

# जखमी सैनिक: कॅप्टन विक्रांत पाटील

रमेश कोरे बी. ए. ३

**ऑपरेशन विजय मिळविण्यासाठी अनेक सैनिक पडले मृत्युमुखी काही झाले जखमी. अशाच एका जखमी सैनिकाच्या सत्काराप्रसंगी त्यांने काढलेल्या उद्‌गाराचे हे शब्दांकन ..........**

'ए मेरे वतन के लोगो ।
जरा ऑखो मे भर लो पानी ।
जो शहीद हुए है उनकी ।
जरा याद करो कुर्बानी ॥

भारत मातेच्या रक्षणासाठी ज्या शूर वीरांनी आपल्या प्राणांची आहुती देता देता, घुसखोरांशी लढता-लढता आपले प्राण अर्पण केले त्या शूर वीरांना माझा प्रणाम ! आणि भारत मातेच्या रक्षणासाठी, घुसखोरांशी लढताना जखमी झालेल्या शूर वीरांनाही माझा प्रणाम. अशाच एका जखमी झालेल्या शूरवीरांची ही कथा.

गावच्या शिवेला लागून डोंगराखाली वसलेले त्या शूर वीराचे गांव क ॥ वाळवे ता. राधानगरी येथे त्यांचा जन्म होऊन आपल्या पित्याच्या पाठोपाठ भारत मातेच्या रक्षणासाठी आपल्या जीवनाची पराकष्टा केली. हा सुपूत्र म्हणजे कॅप्टन विक्रांत पाटील. हा कारगीलच्या युध्दमूमीवर लढता लढता जखमी झाला.तो पूर्णपणे बरा झाल्यानंतर आपल्या मायमूमीत प्रवेश करतो आणि त्यांचा सत्कार जिल्ह्याच्या मान्यवरांकडून केला जातो. आणि भयभीत न होता तो घडलेल्या प्रसंगाची माहिती सांगतो. सत्काराप्रसंगी कॅ. विक्रांत पाटीलचे एकच वाक्य भारत मातेच्या अभिमान सांगणारे आहे. '' पाकिस्तानला आम्ही एक इंचही जागा देणार नाही...! त्यांचे उद्‌गार भारत मातेबद्दलचा अभिमान व्यक्त करणारे आहेत.

''अपने तो मेरे दिल को छूँ लिया ..........''

सत्कारानं भारावलेल्या विक्रांतचे या बोल उपस्थितांची मन गहिवरतात. आहे. हा सत्कार मा एकट्याचा नाही. जे सीमेवर लढत आहेत. जख होत आहेत. वीरमरण पत्करत आहेत. त्या शूरवीरां सत्कार आहे. ह्यावरुन त्यांच्या मनातील जवा बंधूविषयी असणाऱ्या प्रेमाला पाझर फुटतो.

देशभक्ती ही भारतवासीयांच्या रोमा रोमा शिरली आहे. विश्वासघात करणाऱ्या पाकिस्तानल एक इंचही जागा देणार नाही. त्याचा हा सत्का जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातील सभागृहात झाला. हा सत्कार करण्यासाठी महापौर कांचन कवाळे, जिल्हाधिकारी अरविंदसिंह यानी त्यांना शुभेच्या दिल्या. सत्कारास उत्तर देताना विक्रांत म्हणतात की, संपूर्ण देश हा जवानांच्या पाठीमागे उभा आहे. पुढे तो भारावून म्हणतो की, '' हा सत्कार मनोबल वाढविणारा त्या मनोबलापुढे तिथले डोंगर, दऱ्या सुध्दा फिके पडतील. या आवेशाने आम्ही मोठ्या जोशाने पुन्हा लढू. भारताचा विश्वासघात करणाऱ्या पाकिस्तानला असा धडा शिकवू की ते आयुष्यभर विसरणार नाहीत. प्रशिक्षण काळात आमच्यात देशभक्ती भिनवली आहे. देशासाठी आम्ही काहीही करायला तयार आहोत. सैन्य दलातील प्रत्येक रेजिमेंटला वेगळाच मान असतो. त्यांचा मान वाढविण्यासाठी सर्वांचा प्रयत्न असतो. 'तो पळून आला असे कोणी म्हणू नये' म्हणून प्रत्येक जवान प्राणाची बाजी लावून लढत असतो.

या शूरवीराच्या सत्काराच्या उद्‌गाराने संपूर्ण भारतातील तरुणापुढे देशभक्तीची ओढ निर्माण झाली पाहिजे.

• • •

# एक कळी : कुस्करलेली

विजय तिकोडे बी. एससी. १

**मुलगी वयात आली की, सुरु होते तिच्या लग्नाची गडबड. नवरा, त्याचा स्वभाव, सवयी कुठे पाहिल्या जातात. मग हळव्या स्वभावाची मुलगी पडते बळी. दारुड्या नवऱ्याच्या छळाला बळी पडलेल्या स्त्रीची ही व्यथाकथा............**

ती एक अल्पप्रकाशीत पण शांत, आणि भेसूर रात्र होती. सोबतीला रातकिड्यांची कर्र ऽऽ कर्र ऽऽ किरकिर, भयावह गूढ शांतता आणि त्यातच न्हाव्याच्या विहिरीचा मोडका कठडा. जवळच्या मोठ्या झाडाची मुळे शिरुन ढासळलेला. त्याला टेकून बसलेली शांती, दोन्ही गुडघ्यावर हात ठेवून त्यावर हनुवटी टेकलेली. केस पूर्ण विस्कटलेले. चेहऱ्यावर कशाचा तरी जबरदस्त पगडा. नजरेतील वैषम्य आणि ती स्फोटक नजर थोड्या प्रकाशीत चंद्रावर रोखलेली. त्यातचं तिच्या मनातं विचाराचं काहून माजलेलं. काळाचे काटे झर्रकन उलटे फिरले आणि तिला तिच्या दहा वर्षापूर्वीचा काळ तिच्या मनचःक्षु समोर जसाच्या तसा उभा राहिला.

त्यावेळी तिची नुकतीच सातवीची परीक्षा झाली होती. मे महिन्याच्या सुट्टीत ती दरवर्षीप्रमाणं तिच्या मामाकडं राहायला गेली. चार पाच दिवस होतात न होतात तोच, एक दिवस तिची मैत्रीण खेळता खेळता सहज बोलली.

"शांते, आज तुला बघायला येणार हाईत न्हवं? "

" काय? काय म्हणालीस, तुझं डोस्कं तरी थाऱ्यावर हाय काय? " खेळण्यातला गदगा हातात तसाचं धरुन शांती कडाडली. " तुम्हाला कोण सांगतया गं आसं ? आगं माझं वय ते काय आणि ह्या वयात माझं लगीन लावत्यात व्हयं. आणि ते मला तरी समाजलं आसतं का न्हाई ? का माझ्या बिगार लगीन लावणार हाईत ? "

" ये बया, ते कायबी म्हाईत न्हाई. माझी आई म्हणीती, 'तुझं लगीन ठरवणारं हाईतं आणी नवरा बी बिजोरा हाय.'' मैत्रीणीचे शब्द तिचे काळीज चीरीत गेले. तिच्या कोवळ्या बालमनावर प्रहार करुन कोणीतरी त्याच्या ठिकऱ्या उडवत आहेत असं तिला वाटलं. ती तशीच घरात आली. आणि मामीला विचारले, तरी तिने न बोलता फक्त मान हलवून होकार दिला. शांतीने प्रचंड विरोध दर्शविला. पण काही फायदा झाला नाही.

कारण तिचे आईवडील फार खुषीत होते. जावई मोठ्या कंपनीत कामाला होता. अंगापिंडान मजबूत. शिवाय घरदार, शेतीवाडी सर्व काही ठिकठाक आहे. अशी माहिती मिळाली होती. फक्त त्याची पहिली बायको वर्षभरापूर्वी जळून मेली होती. ( जळून की जाळून तिलाच माहीत) आणि तो कधी मधी थोडी फार (?) दारु पीत असे. बस्स ऽऽ एवढंच.

शेवटी एक दिवस शांतीचं लग्न झालं. तिच्या आई- वडिलांच्या डोक्यावरचा धोंडा उतरला होता. हुंडा म्हणून नाही( ?) पण मुलीच्या अंगावर म्हणून जावयाच्या म्हणण्यानुसार दोन तोळ्याचं घंटन, कर्णफुले, जोडवी कर्ज काढून का असेना केली. लग्न देखील नवरीकडेच झालं.

झालं. थोडे दिवस अगदी मजेत गेले. आणि एक दिवस बऱ्याच वेळानं शांतीचा नवरा घरी

आला. तो पूर्ण शुध्द हरपूनचं. दारुन तो बेभान झाला होता. दारु त्याच्या मस्तकांत शिरली होती. त्याची कपडे कुठल्यातरी गटारात पडल्याच्या खूणा दाखवत होती. ते पाहून शांती हादरली. तिची बोबडी वळली. पण पुढच्याच क्षणी तिच्या डोळ्यापुढे काजवे चमकले. नवऱ्याने तिला सणसणीत चपराक हाणली होती. परंतु त्याने तिच्या बकोटीला धरुन तिच्या अंगावरले सर्व दागीने काढायला लावले. ती प्रतिकार ही नाही करु शकली.

तिने तो प्रकार दुसऱ्या दिवशी तिच्या आईवडिलांना कळवला. पण तिकडून उत्तर आले की मुलीचे आयुष्य व इज्जत नवऱ्याच्या हातात असते. त्यामुळे त्याच्या विषयी ब्रदेखील काढू नकोस. वर 'जाती साठी माती खा !' असा गोड (?) सल्ला देखील दिला.

आता जावई हळूहळू पूर्णपणे दारुच्या व बाईच्या आहारी गेला. त्या वेडापायी त्यानं घरातला सर्व पैसा आडका संपवून घर व जमीनही गहाण टाकली. तशातच शांतीचे कमी वयात लग्न झाल्याने पदर आला नाही. त्यामुळे मुलही लवकर होईना.

त्यामुळे तर तिचा नवरा तिला रोज मारपीट करु लागला. आणि पैशाची देखील मागणी करु लागला. पैसे मिळाले नाही की तो रोज एखादे भांडे विकायचा. शांती तरी त्याला कुठून पैसे देणार होती ! ती बिचारी आता रोज एकाचा बांध पुजायची. त्या आयाबायांनी दिलेली अर्धीकोर मीठ भाकर घरी तशीच आणून नवऱ्याला द्यायची. शेजारणीचं ऐकून तीनं किती देवांना नवस केलं होत. त्यांना विनवून तरी काय फायदा.

हळूहळू शांतीची मानसिक स्थिती पार रसातळाला गेली. या दररोजच्या मारपीटीनं आणि अर्ध उपाशी राहण्यानं काय होणारं. ती वेडयासारखे चाळे करु लागली. आणि बघता बघता ह्या वेडाच्या राक्षसाने तिच्या मेंदूवर पूर्ण ठिय्या मांडला.

आता ती आसपासच्या पाचसहा गावात वेडी म्हणून प्रसिध्द पावली. त्या सर्व गावातून ती कधीही आणि कुठेही फिरु लागली. रात्री-अपरात्री. आणि हिच संधी साधून गावातल्या दारुड्या लांडग्यांनी एक दिवस तिचे लचके तोडले. आणखी एक कळी ह्या समाजाने उमलण्या आधीच कुस्करली होती.

झाडावरच्या घुबडाच्या घुत्काराने शांतीची तंद्री भंग पावली. आणि अचानक दृढनिश्चय करुन तिने न्हाव्याच्या विहिरीत आपला दुखःद अध्याय संपवला .

अशी एखादी कहानी ऐकून, पाहून किंवा वाचून लोकं पाघळतातं. द्रवतात. पण हे पाघळणं, द्रवण तेवढ्या पुरतचं. कारण हा समाज दिवसाला कितीतरी अशा कळ्या कुस्करत असतो.

त्यामुळे अशी कहानी घडू द्यायची की तिला लाथ मारुन समाजातून कायमची घालवून द्यायची याचा विचार आता तुम्हाला करायचाय.

• • •

# विषारी व बिनविषारी साप कसे ओळखाल ?

## १) सापाचा चावा

| ※ विषारी | ※ बिन विषारी |
|---|---|
| १) शरीरावर अनेक ठिकाणी चाव्याचे ठसे उठत नाहीत | १) शरीरावर अनेक ठिकाणी चाव्याचे ठसे उमटतात. |
| २) साप चावताच चाव्याच्या दोन्ही बाजूस सुळ्याचे दोन-दोन ठसे उमटतात. | २) दोन्ही बाजूस सुळ्यांचे ठसे उमटत नाहीत. (सुळे नसतात.) |
| ३) विषारी साप चावल्या नंतर रक्तप्रवाह अखंड प्रमाणे सुरु राहतो. | ३) रक्तप्रवाह थोड्या वेळानंतर बंद राहतो. |

## २) सापाची शेपूट

| ※ विषारी | ※ बिन विषारी |
|---|---|
| १) शेपटी चपटी व टोकदार असते. | १) शेपटी गोल व टोकदार असते. |
| २) शेपटी वरील खवले त्रिकोणी व लांबट असतात. | २) शेपटीवरील खवले निमुळते असतात. |

## ३) डोक्याचा आकार

| ※ विषारी | ※ बिन विषारी |
|---|---|
| १) गोलाकार व चपटे | १) त्रिकोणी व फुगीर |
| २) डोक्याचे खवले जवळ जवळ असतात. | २) डोक्याचे खवले लांब व मोठे असतात. |

व्ही. टी. पाटील बी. एस्सी. २

# सर्प दंशावरील प्रथमोपचार :

१) साप चावलेल्या माणसाने घाबरता कामा नये. कारण घाबरल्यामुळे रक्ताभिसरण वाढते व त्यामुळे विषयुक्त रक्त हृदयार्पत जाऊ शकते व मनुष्य तात्काळ मरु शकतो.
२) साप चावलेल्या माणसाला भीती न दाखवता दिलासा दिला पाहिजे.
३) साप चावलेल्या माणसाने हालचाल करु नये.
४) ज्या ठिकाणी चावा घेतला आहे. ती जागा स्वच्छ पाण्याने धुवून घ्यावी.
५) चावा घेतलेल्या ठिकाणापासून काही अंतरावर दोरीने अथवा कपड्याने घट्ट बांधावे.
६) चावा घेतलेल्या ठिकाणी टोकदार वस्तूने ओरखडा काढावा.
७) तोंडात जर जखम नसली तरच तोंडाने चावलेल्या जागेचे रक्त ओढून घ्यावे.
८) रुग्णास जवळच्या दवाखान्यात दाखल करावे.

एच. पी. पाटील बी. एस्सी. २

# सापांचे वर्गीकरण :-

| १) विषारी :- | २) बिन विषारी :- |
|---|---|
| १) घोणस | १) अजगर |
| २) नाग | २) धामण |
| ३) फुरसे | ३) विरोळा |
| ४) पाणसाप | ४) हरणटोळ |

# सापाबद्दल अंधश्रध्दा

१) साप डूक धरत नाही.
२) सापाच्या अंगावर केस नसतात.
३) सापाच्या डोक्यावर मणी नसतो.
४) साप चावल्यावर देवळात बसू नये.
५) सापाला कान नसतात.
६) साप दुध पीत नाही.

**महत्वाचे काही :-** १) बऱ्याच सापांच्या विषाचा उपयोग औषधे तयार करण्यात होतो.
२) १० ग्रॅम सोन्याची किंमत = १ ग्रॅम सापाचे विषाची किंमत

एच. पी. पाटील बी. एस्सी. २

# दुरावा

प्रेम या शब्दाशीच नव्हता माझा संबंध,
पण, तुझ्याच रुपानं घातलं मला हे प्रेमाचे बंधन.

तुझ्या सौंदर्याने केलेल्या आव्हानाला
मोहून गेलो मी तुझ्या रुपाला.
कारण, आवडत होतेस तू मला.

काही दिवस घालवले तुझ्याजवळ स्वस्त
सुखात,
नंतर काटे पडले नशीबात.

आधी तू दिलास निवारा
नंतर मी एकटाच आवारा
प्रेमाला सुध्दा होता पुरावा
तरीही उरला फक्त दुरावा.

मारुती कांबळे बी. ए. १

# निसर्ग

माणूस जरी गेला चंद्रावर
तरी जळणार आहे सरणावर

किती जरी लागेल शोध
निसर्गाचा नाही होणार बोध

कोणी घडविले धरती, आकाश
कोणी दिला साऱ्यांना प्रकाश

चंद्र, पृथ्वी कोणी घडविली
कोणी ही शक्कल लढविली

शास्त्रज्ञांचा शोध उच्च आहे
निसर्गापुढे सारे तुच्छ आहे

निसर्गापुढे नाही कोणही जाणार
आव्हान त्याला नाही कोणी देणार

माणूस जरी गेला चंद्रावर
तरी जळणार आहे सरणावर !

रसूलसो पिंजारी बी. ए. ३

# त्या ओसाड माळावर......

त्या ओसाड माळावर,

आठवणीने फुलली फुले,
त्या फुलांना वास आहे, गंध आहे.

वेलांना फुटली पाने,
त्यांचे रंगच वेगळे,
त्या रंगांनी मला
आकर्षित केले.

न जाणवला काही रंग
मी होतो त्यातच दंग
पण अचानक रंग बदलला
आणि पाने कोमजून गेली,

त्या ओसाड माळावर,
एकटीच फांदी राहिली
त्या फांदीला मी सोडून गेलो
पण त्या फांदीला
मी विसरुन गेलो.

विश्वनाथ पाटील बी. एस्सी. २

# ओढा

खळखळत वाहणारे पाणी
विचारत होतं झाडा- झुडपांना

कसे उभे राहता एकटक
न फिरता जंगलभर
कसे बुआ जमतं तुम्हाला
न आळस देता क्षणभर

मला नाही जमायचं
एकसारख थांबायच
कुणी मला आडवलं
तर जीव होतो हैराण
म्हणून धरण फोडून दे
होतो मी पसार.

सुरेश यादव बी. ए. २

## का ?

सर्व असूनसुध्दा नसल्यासारखा हा प्रवास
का छळतोय मला हा एकटेपणाचा सहवास ?
का वाहतो हा वारा माझ्या समोरुन मंद ?
का होतात दाही दिशा मला पाहून धुंद ?
का वाहते हे पाणी माझ्याकडे पाहूनी संथ ?
का होतात फुलबागा मला शांत पाहून ?
का होते हालचाल माझ्या या मनात ?
का घुमतो आवाज माझ्या कानात ?
का होतात माझ्या वाटा रुंद-रुंद ?
का पडतोय प्रत्येक पाऊल मंद-मंद ?
का व्हावे माझे सारे जीवनच ठप्प ?
होईन आज ना उद्या या विश्वातूनी गडप.

नेताजी पाटील बी. ए. १

## प्रश्न ?

काही प्रश्न असे असतात,
त्याची उत्तरे सापडत नसतात.
काही प्रश्न असे असतात,
त्याची उत्तरे प्रश्नातच असतात.
काही प्रश्न असे असतात,
त्याची उत्तरे समजतच नसतात.
काही प्रश्न असे असतात,
त्याची उत्तरे जगात नसतात.
काही प्रश्न असे असतात,
त्याची उत्तरे वेळ गेल्यावर कळतात.
प्रश्न उत्तराच्या समीकरणातच
माणसे जीवन जगत असतात.
काही प्रश्नांच्या उत्तराच्या शोधातच
आयुष्यभर गुरफूटून जात असतात.

सरिता जाधव बी. ए. २

## ऊसकरी शेतकरी

कारखान्याला ऊस गेला
हिशोब केला सारा।
कारखान्याचे बील नाही,
थकीत शेतसारा ॥

फोडणीवर फोडणी ती
लाडू करंज्याला।
बोनस वाढी टक्क्याने,
नोकर हारकला ॥
धनिकांची दिवाळी,
डोकी कर्जाचा तो भारा ॥
कर्जात जन्मला, कर्जात वाढला
सवय झाली त्याला।
स्वाभिमानी हा अपमान पचवतो
नमस्कारी शिपयाला ॥
जिवतं असूनी मेलेला तो,
खेळ नियतीचा सारा ॥

तानाजी पाटील बी. ए. ३

## मित्रत्व

*जीवनात नाती असतात अनेक*
*नात्यामध्ये मैत्रीचं नात असतं नेक*
*मैत्रीत कराव लागत प्रेम*
*मैत्रीच्या रोपट्याला*
*खावावी लागतात विश्वासाचं खत,*
*श्रीकृष्णासारखे सुदाम्याचे पोहे.*
*मैत्री एक त्यागाचं प्रतीक,*
*मैत्री म्हणजेच सुर्याच्या प्रखर*
*प्रकाशाची शुभ्रता.*

मारुती फराकटे बी. ए. २

# आई

माऊलीचे डोळे । डोळ्यात अश्रू ।
अश्रूत माया । विसावली ॥
विशाल हृदय । हृदयात प्रेम ।
प्रेमाचा सागर । ओसंडतो ॥
कष्टाचा डोंगर । प्रेमाचा डोंगर ।
घेवून लेकरु । चालली ॥
कष्टात शिनली । कधी न बोलली ।
दुसऱ्याच्या हिता । सरसावली ॥
मुखी प्रसन्न । मांगल्य संपन्न ।
वाणी मंगल । बोलली ॥
अमृताचा धडा । घेवूनी सदा ।
डोकीवर भार । चालली ॥

चंद्रकांत बोंगार्डे बी. ए. १

# अमृता (देशपांडे)

अमृताहून गोड अमृताचा,
केलास तू घात.
एकतर्फी प्रेमातून,
लावलीस तिची वाट.
मजा आली असेल तुला
तिच्या खुनात,
काय अर्थ राहिला
असल्या प्रेमात.
काय चूक होती तिची ?
काय गुन्हा होता तिचा?
तिने तर तुझ्यावर टाकला विश्वास,
पण तू तर तिचा गळाच कापलास,
अशा 'बबन' ना शिक्षा फाशीच हवी.
तरच सुधारेल पिढी नवी.
म्हणूनच सांगते मित्रहो !
असा कुणाचा करु नका घात,
लावू नका स्वत:च्या आयुष्याची वाट.

रुपाली पताडे बी. ए. १

# फुलपंख

धुंदित वाट चालता
मस्तीत रंग येतो
प्रिये त्या फुलातही
मी प्रीतीचे रंभ पाहतो
मदमस्त तू होता
फुलतो ताटवाही
हृदयातील फुलपंखे
भिरभिरती तुजभोवती
गाऊनी रुपाचे गुंजन
पंखात रंग भरले
पृथ्वीला कवटाळणारे
क्षितीज मज लाभले.

हेमंत पाटील बी. ए. ३

# देशप्रेम

दीनदुबळ्यांच्या घासांचे लचके तोडून,
मिळविलेल्या उसन्या बळावर,
हातात तिरंगी झेंडा घेऊन,
अन् 'मेरा भारत महान '
म्हणत ओरडणे म्हणजेच जर देशप्रेम असेल
तर नको आम्हाला
तुमच्या 'देशप्रेमीच्या' पदव्या
आम्ही मात्र कारगीलला
लढलेल्या जवानांचा
आदर्श पुढे ठेवून
मनात पेललेलं, हृदयात कारलेलं,
जिभेच्या आतच ठेवलेलं,
भारतमातेवरचं आमचं प्रेम असचं
जपत राहणार ....
मग तुम्ही 'देशद्रोही ' म्हणून
आम्हाला हिणवलं तरी चालेल !

शिवाजी पाटील बी. ए. ३

# एक क्षण

एक क्षण असा येता की ह्या काळजाला
खुलवून ही जातो आणि दु:खहून ही जातो
एक क्षण असा येता आनंदाचा
वेड्या मनाला देणारा जुळवून टाकणारा
एक क्षण असा येतो ओठातल्या ओठात हसविणारा
मनातलं प्रेम सांगणारा
एक क्षण असा येतो वाऱ्यावर डोलणारा
स्वच्छंद हवेमध्ये झुलावेसे वाटणारा
एक क्षण असा येता काहीतरी चुकेल असे वाटणारा
त्यावेळी न कोणाला कळणारा.

**कु. मिनाक्षी पाटील** बी. ए. १

# फक्त तुझ्यासाठी

*तू वळून पाहिलस अन्,*
*तुझ्या नजरेतील प्रितीचे बोल*
*माझ्या हृदयात सामावले*
*तुझ्या मंद स्मित्यानं*
*माझे हास्य चोरलं*
*तुझ्या सतेज चेहऱ्यानं*
*मला पूर्णत: चित केलां*
*अन् तुझा प्रत्येक शब्द*
*माझा श्वास बनू लागला*
*सांगू लागला जगायचं तर*
*फक्त तुझ्यासाठी, फक्त तुझ्यासाठी*

**सतीश पाटील** बी. एस्सी. ३

# उत्तर

पाकच्या कुरबुरींना उत्तर आता द्यायला हवं.
दहशतवादी घुसखोर प्रश्नाकडे पहायला हवं.
कितीदा चर्चा, किती दिवस गप्प राहवं.
वाकडी शेपूट सरळ करण्या ऑपेरशन व्हायला हवं !

रोज बातमी गोळीबार चार ठार वारंवार
पंडिताची कत्तल, निरापराध्यांना बेदम मार.
अपहरणाचं नाट्य किती दिवस पहावं.
पाकच्या कुरबुरींना उत्तर आता द्यायला हवं.

माफीच्या धोरणांनीच ते असे उर्मट आहेत
गझनीसारखे वारंवार प्रतिहल्ले होत आहेत.
इतिहासातून धडा घेऊन घोरीला पाडाय हवं
पाकच्या कुरबुरींना उत्तर आता द्यायला हवं.

रुपसुंदर स्वर्गसुंदर काश्मीरवर डोळा आहे
त्यासाठी 50 वर्षे ऊर बडवून घेत आहे.
काश्मीरसाठी, देशासाठी त्यागी आता व्हायला हवं
पाकच्या कुरबुरींना उत्तर आता द्यायला हवं.

सत्तापक्ष विरुध्द यांनी एक व्हायला हवं
सत्तापक्ष, ममता, जयललिता यांनी गप्प रहायला हवं.
देशाच्या रक्षणाला आता सिध्द व्हायला हवं
पाकच्या कुरबुरींना उत्तर आता द्यायला हवं.

**विनोद यमगेकर** बी. ए. ३

# प्रेम कुणावर करावं ?

प्रेम का करावं ?
आजवर कळलं नाही,
मनासारख गीत
आजवर जुळलं नाही.
प्रेम कुणावर करावं ?
फेसाळणाऱ्या लाटेवर,
खळाळणाऱ्या झऱ्यावर,
वेळू बनातल्या शिळेवर,
लाजणाऱ्या लाजाळूवर,
भरारणाऱ्या पंखावर,
छुनछुनणाऱ्या पैंजणावर,
गालावरच्या खळीवर,
खोट्या नाट्या शपथेवर,
जागवणाऱ्या रातीवर,
रडवणाऱ्या विरहावर,
घडणाऱ्या भेटीवर,
खुललेल्या चांदण्यावर,
बेधुंद कोसळणाऱ्या पावसावर,
हुडहुडी भरवणाऱ्या थंडीवर,
जाळून टाकणाऱ्या उन्हावर,
प्रेम करावं सगळ्या जगावर.

नारायण पाटील बी. ए. २

# प्रेमभेट

मी दिवस संपल्याची वाट पाहतो,
मला रात्रीची ओढ असते.
मी रात्रीची वाट पाहतो,
रात्र झोपेची असते.
मी झोपेची वाट पाहतो,
झोप स्वप्नाची असते.
मी स्वप्नाची वाट पाहतो,
स्वप्नात तिची भेट होते.

ज्योतीराम पाटील बी. ए. ३

# चारोळ्या

तू निघून गेल्यापासून
निशिगंध बहरला नाही
अंगणातील जाईची वेल
फुलांनी कधीच उवरली नाही

तुझा स्पर्श झाला तेव्हा
माझं अंग शहारुनआलं
आपण खरच चूक केली
नंतर हे कळून आलं

पाऊस सुरु झाला की
माझे डोळे गळू लागतात
काळजाच्या भग्न किल्यात
आठवणींचे दिवे जळू लागतात.

तुझ वय किती ?
सहज तिला विचारलं
कित्ती वर्ष झाली १६ च आहे
तिच्या आईन उत्तर दिलं

खुशाल जाळा मला
मी मेल्यावर
पण दाखवाल कसा हक्क
माझ्या आत्म्यावर

हो मान्य आहे
स्त्री स्वतंत्र आहे
तेच तर तिच्या
मरण सरणातलं अंतर आहे.

कु. सविता पाटील बी. ए. ३

## हे असं का होतं ?

माहीत असतं हे मिळणारं नाही,
तरीही मन त्याचा पिच्छा पुरवत
आणि मिळालं नाही म्हणून कष्टी होतं.

.......... हे असं का होतं ?
माहित असतं हे विसरणं अशक्य आहे
पण तरीही मन ते विसरण्याचा
असफल प्रयत्न करतं, आणि
स्वत:लाच विसरुन बसतं
..........हे असं का होतं ?

माहित असतं, की काहीतरी कमावण्यासाठी
काहीतरी गमवावं लागतं,
पण थोड काही कमावण्याच्या नादात
सर्वच काही गमावून बसतं
..........हे असं का होतं ?

बरच काही सांगायचं असतं,
सांगितल्यावाचून समजणारही नसतं
पण बरच काही सांगण्याच्या नादात
सांगायचं तेच नेमक राहून जातं

.......... हे असं का होतं ?
माहित असतं, भावनेपेक्षा कर्तव्य
श्रेष्ठ आहे, तरीही कर्तव्याच्या
चाकोरीत न बसता मन
भावनेच्या ओघात वाहून जाते
.......... हे असं का होतं ?

सगळच कांही माहित असतं,
सगळच कांही जाणत असतं
तरीही मन अजाणपणे वागत असतं
..........हे असं का होतं ?

भास्कर सावंत बी. एस्सी. ३

## भावनांचा उद्रेक

माझ्या या मुक्या भावनांचा
आधार केव्हाच गेला आहे तुटून
नाते हे हृदयातले,
बंध मनातले

जवळीक साधता-साधता
का ? हो दरी रुंदावली काही कळलेच नाही,
संपून गेलेले आयुष्य सारे
शेवटचा श्वास आता घेत आहे.

धळलेल्या आसवांना आवरणं आता कठीण आहे
पुन्हा पुन्हा डुंबत मी नविन जगत आहे.
दूर राहिली मैफल माझी.
तिचा रस्ता आता अंधारात आहे.

जीवन आहे नवी सुरुवात आहे
हे तर मी मानतो आहे.
पण, काळाच्या आघाताने
देहाचे लक्तरे आता टांगणीला लागली आहेत.

तडफत - तडफत सारे आयुष्य संपले
का ? असा मरुन जाण्यासाठीच
मी जन्माला आलो आहे !
लढाई मला जिंकायची होती
पण, पहिलाच बाण वर्मी लागून
घायाळ झालेल्या सावजासारखा
मी आता तडफत आहे.

रुपेश चौगले बी. एस्सी. १

# एक तू ....

एक चांदणी हवी होती
आकाश सजविण्यासाठी
एक साध्य हवी होती
धुंद क्षण जगविण्यासाठी

एक दृष्टी हवी होती
जीवन माझे बदल्यासाठी
एक आश हवी होती
निराशेवर मात करण्यासाठी

एक हाक हवी होती
जन्मभर ऐकण्यासाठी
एक मार्ग हवा होता
तुझ्यापर्यंत पोचण्यासाठी

एकच तू हवी होतीस
जीवन सार्थक करण्यासाठी

**अर्चना चव्हण** बी. ए. १



# चारोळ्या

उमलणं आणि फुलणं,
यात बरच अंतर आहे,
उमलण अगदी स्वाभाविक आहे,
फुलणं त्यानंतर आहे

मला पक्क ठाऊक आहे की
प्रत्येक गोष्टीला अंत आहे
म्हणूनच मी काही बोलत नाही,
मी अगदी शांत आहे.

देवळात जाऊन माणसे
दुकानात गेल्यासारखी वागतात
चार- आठ आणे टाकून,
काही ना काही मागतात

एकदा वाटल तुला स्पष्टच सांगाव
मग वाटल कागदावर लिहाव,
नंतर म्हटल जाऊ दे,
तुझ तुला कळतयं का ते पाहव.

माझ्या मनाचा माझ्या मेंदूशी,
छत्तीसचा आकडा आहे,
माझ मन तस सरळ आहे
या मेंदूचाच रस्ता वाकडा आहे

कापरासारखं जळणं,
मला कधीच पटत नाही,
तशी जळण्यास माझी ना नाही,
पण शेवटी काहीच उरत नाही

मरण दाराशी आल्यावर मी म्हटल
तुला शंभर वर्षे आयुष्य आहे,
मरणही चाट पडलं, म्हणालं,
काय हा मनुष्य आहे ?

इथे वेडं असण्याचे
खूप फायदे आहेत,
शहाण्यासाठी जगण्याचे
काटेकोर फायदे आहेत.

**अर्चना चव्हण** बी. ए. १

# श्रध्दा

नाना उठले
आणि त्यांच्या भरदार
आवाजात बोलू लागले,
बा मेला
तेला जाळला
वड्याच्या काठाला
तीन दिसानं पाणी ठेवलं
लय काय काय जमलं
कावळ्याला इनवनी करुन
लोक सारं दमलं
माणसाच्या गर्दीला
कावळा भ्याला
म्हणून त्यानं आड धरला
बा च्या थोरल्यानं हात जोडला
समदं यवतशीर बघतु म्हणला
तरीबी कावळा खाली नाही उतरला.
जमाव सारा विथरला
आणि... कावळ्याला हात जोडू लागला
दिवस भरले
सुगी आली
शिवारं फुलली
कणसं डोलू लागली
कावळं विचारं
कणसावर बसू लागलं
माणसांच्या हातात
गोफन फिरु लागली
जे हात जोडून
कावळ्याला पिंडाला शिवण्याची
इनवनी करीत होते
तेच हात आता
गोफनीनं कावळ्याला
दगड मारीत होते
हा कसला न्याय
आणि..
ही कसली
श्रध्दा.

कु. रुपा कांबळे बी. ए. १

# तीन गोष्टी

तीन गोष्टीचा अंगी बाणा असावा.

*शहाणपणा, सहनशीलता, चांगुलपणा*

तीन गोष्टी आठवणीत राखा.

*सच्चाई, कर्तव्य, माणुसकी*

तीन गोष्टी किंमती आहेत.

*आपली अक्कल, अब्रू, सदाचरण*

तीन गोष्टी समान आहेत.

*आई, वडील, गुरु*

तीन गोष्टी यशाची गुरुकिल्ली आहेत.

*परिश्रम, नम्रता, प्रामाणिकपणा*

तीन गोष्टी कुणाची अपेक्षा करत नाही.

*वेळ , मृत्यू, ग्राहक*

तीन गोष्टी एकदा गेल्यावर परत येत नाहीत.

*बाण ,शब्द, प्राण*

तीन गोष्टी जीवनात एकदाच मिळतात.

*आई, वडील, तारुण्य*

तीन गोष्टी भावाभावामध्ये दुरावा निर्माण करतात.

*जर, जोर, जमिन*

तीन गोष्टी आरोग्याची गुरुकिल्ली आहेत.

*व्यायाम, सात्विक विचार, हलका आहार*

महेश पाटील बी. ए. १

# दुध साखर महाविद्यालय बिद्री

दु धगंगेस वेदगंगेने दिली साथ.

ध रणे झाली भरु लागले नदीचे काठ.

सा कार झाली भूमातेची हिरवी लाट.

ख रा मान त्या महान पुरुषाचा.

र चला पाया नंतर त्यांनी औद्योगिककरणाचा.

म हान साखर कारखाना उभा केला ओसाड माळावरती.

हा ल अपेष्टा सहन करुनी केली हरित क्रांती.

वि कास झाला गरिब शेतकरी, शेतमजूरांचा.

द्या ल का शान शाळा कॉलेजांना.

ल हान रोपटे आता मोठे कल्पवृक्ष झाले.

य ज्ञ, मंत्र करुनी न होणारी क्रांती झाली.

रघुनाथ पाटील बी. ए. भाग १



# हिन्दी विभाग

" इस विकास गति के आगे है कोई दुर्दम शक्ति कही,<br>
जो जग की स्रष्टा है, मुझको तो ऐसा विश्वास नही "

– अज्ञेय

विभागीय सम्पादक

**प्रा. धनंजय दिघे**

# अनुक्रमणिका

## हिंदी विभाग गद्य


| | | | |
|---|---|---|---|
| १) | मानवता सच्चा धर्म | रसूलसो पिंजारी | बी. एं. ३ |
| २) | हरिशंकर परसाई | शरद शेणवी | बी. ए. ३ |


## पद्य


| | | | |
|---|---|---|---|
| १) | आत्मबल | नारायण पाटील | बी. ए. २ |
| २) | टुटा दिल | रमेश गोते | बी. ए. १ |
| ३) | जीवन | सरीता जाधव | बी. ए. २ |
| ४) | आशिर्वाद | युवराज वाईंगडे | बी. ए. ३ |
| ५) | बेवफाई | अमर पाटील | बी. ए. २ |
| ६) | चाहत | विपुल कोले | बी. ए. १ |
| ७) | मंदिर हमारा | अशोक शेणवी | बी. ए. २ |
| ८) | आशा | युवराज वाईगडे | बी. ए. ३ |
| ९) | याद | शरद शेणवी | बी. ए. ३ |
| १०) | अंधे और आईने | उदय पाटील | बी. एस्सी १ |
| ११) | आय लव्ह यू | उत्तम पाटील | बी. ए. ३ |
| १२) | बंधन | शरद पाटील | बी. ए. ३ |
| १३) | जिंदगी | रामदास फराकटे | बी. ए. ३ |


## शेर- शायरी


| | | | |
|---|---|---|---|
| १) | शेर- शायरी | रसूलसो पिंजारी | बी. ए. ३ |
| २) | बाते जिंदगी की | शरद पाटील | बी. ए. १ |

# मानवता – सच्चा धर्म

रसुलसो पिंजारी बी. ए. ३

"सभी धर्मोका मूलतत्व समान होता है और वह कहते है कि 'दया ही श्रेष्ठ धर्म है।' दूसरो पर दया करने के लिए अपने पास बडा मन होना चाहीए मन न होने कारण मनुष्य बदले की भाषा कहने लगता है और शुरु होता है खत्म न होनेवाला संघर्ष........।"

भारत इस वर्ष स्वतंत्रता की 53 वी वर्षगॉठ मना राह है। भारत को स्वतंत्रता मिलकर इ. 2000 में 53 वर्ष पुरे होते है। इन 53 वर्षो में भारत ने क्या पाया और क्या खोया यह देखना बहुत जरुरी है। भारतीयोने सभी क्षेत्र में लक्षणीय प्रगति की है। भारतीय लोग जैसे 21 वी शती में पदार्पन कर चुके है, वैसे ही मानवता खोये जा रहे है। मनुष्य आकाश में पंछी और जल मे मछली जैसा विहार करने लगा है। लेकिन मनुष्य के साथ 'मानवता' का व्यवहार करना भूल गया है। मनुष्य मनुष्य के साथ मनुष्य जैसा व्यवहार नही करता, यही इस संसार में चिंता करने की बात है।

कभी- कभी हम गर्व से कहते है कि, हमारे देश में विविधता मे एकता है। लेकिन इसे पहले हमें यह मानना बहुत जरुरी है कि, इस संसार में कई वार धर्म के नाम से ही राम मंदिर, बावरी मशीद से हिन्दू-मुस्लिम में संघर्ष हुआ था। बम्बई में धर्म के संघर्ष से ही अनेक निरपराध लोगो की हत्याएँ हुई थी। दुसरे महायुध्द में ज्यु लोगों की वांशिक भेद के कारण हत्या हुई थी। इन सभी संघर्षो का मूल कारण है 'धर्म'!

मेरा धर्म तुम्हारे धर्म से कई ज्यादा श्रेष्ठ है यह माननेवाले लोग एक-दुसरो के प्राणों पर उठते हैं। जब मै उनको पुँछता हूँ कि आपने आपके धर्म का कभी सुक्ष्म अध्ययन किया है ? इसका जवाब किसके पास होता है। किसीका भी धर्म दुसरो का गला दबाने के लिए या दुसरो के अधिकार छिनने के लिए तैयार हुआ नही है। मनुष्य ने दुसरे मनुष्य के सुख दु:खों का विचार करना यही सच्ची 'मानवता' है, यही सच्चा मानवता धर्म है।

मानव ही भेदभाव निर्माण करता है। श्रेछ- कनिष्ठ, मालिक- नौकर, उँच- नीच का भेदभाव। मानव ने ही मानव को कितना दीन, लाचार बनाया है। सभी मानव के सुखदु:ख समान होते है। अमीर मॉ को जितनी चिंता होती है। उतनी ही गरीब मॉ को होती है। हर एक मॉ का रुप अलग होता है। लेकिन् मातृत्व समान होता है। तो फिर हम ही भेदभाव क्यों करते है ? इसका कारण यह है, कि मनुष्य की स्वार्थी भावना! मनुष्य को हर चीज पाने की इच्छा होती है। इस इच्छा से ही वह दुसरा की चीजे छिन लेता है। मनुष्य के इस स्वभाव से ही बडे- बडे युध्द होते है।

मनुष्य ने आपने आपसे ही समाज की पहचान करना बहुत जरुरी है। अपनी प्यारी चीज गुम हो जाने या टूट जाने के बाद आपको कितना दु:ख होता है। इतना ही ध्यान में रखा तो दुसरो की चीजे तोडने से पहले अपना हाथ रुक जाएगा। लेकिन् हम कई बार क्रूर बर्ताव करते हैं। अपने फायदे के लिए मनुष्य अन्नधान्य या औषधों में मिलावट करते है। मनुष्य धर्मांधता से या किसी की अविवेकी बुध्दि से बॉबस्फोट करवाते है। जिसमे मनुष्य की इन्सानियत नष्ट हो जाती है।

सभी धर्मो का मुलतत्व समान होता है और वह कहते है कि, " दया ही श्रेष्ठ धर्म है।" दुसरो पर दया करने के लिए अपने पास बडा मन होना चाहीए। मन न होने के कारण मनुष्य बदले की भाषा कहने लगता है और शुरु होता है खत्म न होनेवाला

संघर्ष।

दया की भावना से ही एक परदेशी महिला ने भारत में अपना काम शुरु किया और वह बन गयी '' मदर तेरेसा ''। भारत को ''मदर तेरेसा'' जैसा समाजकार्य करनेवाले इन्सान की जरुरत है। आजकल मनुष्य को मानवता धर्म की जरुरत है। आजकल मनुष्य को मानवता धर्म की जान -पहचान होने लगी है। जग में कहा भी, किस तरह का भी संकट आ गया तो सभी लोग मदत का हाथ बढते है। यह मानवता धर्म का लक्षण है। भारत में जब भूकंप हुआ था तब देश के कोने- कोने से मदत आ गयी थी। कारगिल युध्द में जो शहीद हो गये उनके लिए भी देश के कोने कोने से मदत आ गयी थी। युनिसेफ जैसी संस्थाएँ विश्व में कार्यरत है। आज भारत में रहनेवाले कई बालकों को पाश्यात्य देश में गोद लिया जाता है। तब मानवता का ही दर्शन होता है। अंत मे मै इतना ही कहना चाहता हूँ कि, मनुष्य ने मनुष्य के साथ मानवता जैसा व्यवहार रखना चाहिए। सभी धर्म मे मानवता ही श्रेष्ठ है।

## आत्मबल

अंधेरी रात थी और सुनसान राहे,
मैं गिर -पडकर चल रहा था।
तभी किसीने आकर थामली मेरी बाहे,
मैने उसे देखना चाहा, पर कुछ दिखाई नही दिया,
सुनने की कोशिश की, पर कुछ सुनाई नही दिया।
मैं संभलकर फिर चलने लगा,
और चलते-चलते तनहाई से बतीयाने लगा।
मैं सोचने लगा मुझे जिसने संभाला
कौन था वह शख्स ?
तभी एक आवाज आयी-
तु खो न देना मुझे,
क्योंकि मैं हुँ तेरा आत्मबल

नारायण पाटील बी. ए. २

## टुटा दिल

मासुम था चेहरा जिसका,
दिखती थी परी जैसी।
आँखे उसकी चाँद जैसी
बाल ये कालेकाले।
ओठों की बात बस,
दिवानी कर देती थी।
पर नही लगनी थी,
होगी ऊस प्रेम वासना में।
बहन बनकर बैठ बसे हम,
शरीफ लगती थी चेहरेसे।
एक दिन हमको सुना पडा,
अपनाही साला प्रेम करने लगा।
सुनकर यह उतर गई नजरोसो
टुट पडा वह बहन का नाता।
कभी नही देखा मुडकर उसको,
तोडके बंधन फेका उसको।
कभी नही देखा मुडकर उसको।

रमेश गोते बी. ए. १

# व्यंग्यकार हरिशंकर परसाई

शरद भा. शेणवी बी. ए. ३

'वे अन्याय से पीडीत, शोषित लोगों के दुःख को देखकर व्यक्तिगत दुःख से बाहर निकले। अतः उन्होने जीवन की कीसी भी घटना को छोडा नही। उन्होने तत्कालीन अनेक राजनेता ओं पर व्यक्तिगत नाम के साथ व्यंग्यपूर्ण प्रहार किया ..।'

हरिशंकर परसाई का जन्म मध्यप्रदेश के होशांगाबाद जिले के जमानी गॉव मे 22 अगस्त 1924 को हुआ। उनके पिता का नाम झूमकलाल परसाई था। वह कोयले की ठेकेदारी करते थे। एक मध्यवर्गीय परिवार होने के कारण उनका अपना घर तो था नही, अतः उनको किराए के मकान में ही रहना पडता था।

हरिशंकर परसाई उनके मॉ- बाप के सबसे बडे बेटे थे। परसाईजी के दो भाई और दो बहने भी थी। जब वे तेरह वर्ष के थे तब उनकी मॉ प्लेग की बिमारी के कारण चल बसी। मॉ के पश्चात बच्चो की जिम्मेदारी उनके पिता पर आ पडी। लेकिन कुछ वर्ष बाद वे भी असाध्य बिमारी के शिकार हुए। तब हरिशंकर परसाईजी पर उनके परिवार की सारी जिम्मेदारीयॉ आ पडी। इसी कारण उनका बचपन संघर्ष, अर्थाभाव,. भय, निराशा और गर्दिश मे ही गया। परिवार की जिम्मेदारीयो के कारण वे स्वयं अविवाहीत रहे। अर्थाभाव होते हुए भी वे पढते रहे। उनकी प्रारंभिक शिक्षा इटारसी मे हुअी। और नागपूर विश्वविद्यालय मे एम. ए. किया। उसके बाद डिप्लोमा इन टिचिंग भी किया। 1941 ई से 1943 तक स्पेंस ट्रेनिंग कॉलेज जबलपूर में अध्ययन का कार्य किया।

हरिशंकर परसाई ने अठारह वर्ष की आयु मे इटारसी के पास नाकू मे नौकरी शुरु की। फिर खंडवा मे छ महिने अध्यापन किया। 1943 ई. से जबलपुर के मॉडल हाईस्कूल मे अध्यापन शुरु किया और 1925 ई. मे त्यागपत्र दिया। 1953 ई. से 1957 ई. तक प्राइवेट स्कूलो में अध्यापन की नौकरी की और फिर त्यागपत्र देकर नौकरी को अंतिम रुप से नमस्कार किया।

उसके बाद परसाईजी स्वतंत्र लेखन में जुट गए। परंतु नौकरी छोडने के बाद कुछ महिनो मे ही उनकी एक बहन श्रीमती सीता दुबे के परिवार का दायित्व उन पर आ पडा। लेकिन उन्होन उसको पूरे ढाढस के साथ निभाया। स्वयं अविवाहित रहकर अपनी बहन तथा उनके बच्चो की देखभाल वे अंत तक करते रहे। हरिशंकर परसाईजी ने कुछ पुरस्कार एवं सम्मान भी प्राप्त किए है। 1982 ई को साहित्य अकादमी ने उनको 'विकलांग श्रद्धा का दौर' रचना संग्रह के लिए अकादमी पुरस्कार से सन्मानित किया। 1982 ई. मे ही जबलपुर विश्वविद्यालय ने अपने रजत जयंती समारोह पर डी. लिट की उपाधि देकर सम्मानित किया। मध्य प्रदेश कला परिषद की ओर से उनको एक बार सम्मानित किया। उत्तर प्रदेश साहित्य परिषद का पुरस्कार भी उन्हे प्राप्त हुआ था।

उनका अंतरंग व्यक्तित्व भी विविध पहलुओ से परिपूर्ण दृष्टिगोचर होता है। जो भी समाज - विरोधी और भारत विरोधी लगा उन पर उन्होने कठोर प्रहार किया। और इसके उन्हे परिणाम भी भुगतने पडे। परंतु पूरी क्षमता और ईमानदारी के साथ निरंतर लिखते रहे। वे चिंतन भी करते थे। उनका विविध विषयो का गहन अध्ययन था। इसलिए उनके चिंतन मे भी गहनता तथा गहराई दिखाई देती है। परसाई की संवेदना बहुमुखी रही है।

वे अन्याय से पीडीत, शेषित लोगो के दुःख को देखकर व्यक्तिगत दुःख से बाहर निकले। अतः उन्होने जीवन की किसी भी घटना को छोडा नही।

उन्होने तत्कालीन अनेक राजनेताओ पर व्यक्तिगत नाम के साथ व्यंग्यपूर्ण प्रहार किया। इतना खुलकर लिखना एक फौलादी तथा निडर व्यक्ति के ही बस की बात हो सकती है।

परसाई जी ने बहुत कुछ लिखा है, परंतु निबंध और कहानी लेखन में उनका महत्वपूर्ण योगदान है। 1985 ई. में प्रकाशित 'परसाई की रचनावली' में उनकी 263 कहानियाँ और 288 निबंध संकलित है। जीवन के अंत तक वे लिखते रहे। इसी कारण उनको काहानियो की संख्या तीन सौ से अधिक और निबंध की संख्या चार सौ तक हो गई है। व्यंग उनके कहानियो और निबंधोका प्राणतत्व है. इस रचनावली में से 'भोलाराम की जीव', 'वैष्णव की फिसलन', 'मेनका का तपोभंग', 'एकलव्य ने गुरु को अंगूठा दिखाया', 'आमरण अनशन', 'गाधीजी का शाल' आदि कहानियाँ अधिक सशक्त बनी है।

और 'भूत की पॉव पीछे', 'बेईमानी की परत', 'अपनी अपनी बिमारी', 'पगडंडीयों का जमाना', 'पाखंड का अध्यात्म ' आदि अनेक निबंध उल्लेखनिय है। इसके अलावा 'तट की खोज' और 'रानी नागफनी की कहानी' आदि दो उपन्यास प्रकाशीत हो चूके है। उनका 'बोलती रेखाएँ' नामक संस्मरण संग्रह भी प्रकाशीत हुआ।

परसाईजी ने जबलपुर से प्रकाशित होने वाले 'प्रहरी नामक साप्ताहिक मे 1947 ई. से स्तंभलेखन का कार्य किया। यह कार्य 1960 ई तक चलता रहा। इसमे 'नर्मदा के तट से' नामक स्तंभ में 'अघोर भैरव' नाम से लिखते रहे। और 'परिवर्तन' पत्रिका में 'अरस्तू की चिठ्ठी', 'सारिका' मे ' कबिरा खडा बाजार में', 'कल्पना' में 'और अंत में' तथा 'करंट' में 'माटी कहे कुम्हार से' नामक स्तंभलेखन भी उन्होने पुरी सफलता से किया।

इसी से स्पष्ट होता है, कि उन्होने कहानी, निबंध, उपन्यास संस्मरण, रेखाचित्र, स्तंभलेखन आदि सभी क्षेत्रो में लेखनी चलाई ओर अपनी बहुमुखी प्रतिभा का परिचय दिया। अपनी व्यंगात्मक रचनाओ के कारण वे हिंदी साहित्य संसार मे अमर बन गए। और एक दिन हरिशंकर परसाई जैसे स्वतंत्र रुप से लेखन करनेवाले अमर कलाकार का 10 अगस्त 1995 ई. को स्वर्गवास हुआ और हिंदी साहित्य संसार एक महान प्रतिभा से हमेशा के लिए वंचित हो गया। ● ● ●

# जीवन

**जीवन क्या होता है ?**
**जीने की एक रीत होती है।**
**रहने की एक पध्दत होती है।**
**विचारों की लेन-देन होती है।**

**जीवन क्या होता है ?**
**शब्दो का भंडार होता है।**
**गुणिजनों का संसार होता है।**
**दुर्जनो का भी संसार होता है।**

**जीवन क्या होता है ?**
**जीने की मस्ती होती है।**
**दुःखो की भरती होती है।**
**सुखों की बरसात होती है।**

**जीवन क्या होता है ?**
**बडो कां आशिर्वाद होता है।**
**शिक्षकों का प्रोत्साहन होता है।**
**सहेलियों का सहारा होता है।**
**इसे ही हम जीवन कहते है।**

सरिता जाधव बी. ए. भाग -२

## आशिर्वाद

साथ लेकर यादों के दीप
आदेश प्रेरणा का पाकर,
जा रहे हैं हम यहाँ से
कभी नही भूलेंगे कॉलेज को।

जीवन के कई साल
गुजारे खुशी से यही,
अध्ययन के साथ
पाया अपनापन यही।

नवी दिशाएँ अव मंजिल नवी
अपना अपना है अलग साहित्य
गहरा सागर है अनंत अंवर
किनारा कहाँ है पता नही।

फिर भी इस जिंदगी केपथपर
आशिर्वाद तुम्हारा लेकर
मुसबतों से टकरायेंगे
गीत तुम्हारे गाएँगे।

**युवराज वाईगडे** बी. ए. भाग ३

## बेवफाई

दौलत है ये प्यार की,
जो लुटाई नही जाती।
दिल में है तेरी याद,
जो मिटाई नही जाती॥

तु समझ न रहा था खुद को
अनमोल,
हमारा नही था कोई मोल।
दुनिया में नही दौलत ही सबकुछ,
प्यार बिना नही और कुछ॥

तुझे था रुप का अभिमान,
मुझे था सिर्फ स्वाभिमान।
मैने समझा था सच्चा प्यार,
तुने मुझे ना माना अपना यार॥

दौलत से बिस्तर मिलेगी, नींद नही,
फुल खरीदेंगे, खुशबू नही।
प्यार मिलेगा, रुह नही,
प्यार खुदा है, बेवफाई नही॥

**अमर पाटील** बी. ए. भाग २

## चाहत

चाहा था हमने कि
कोई हमसे प्यार करे
प्यार करे और दिल से इकरार करे।
सुख- दु:ख का साथी बने
ऐसा एक जीवनसाथी मिले।

जिसे चाहा उसे देखकर
खिल उठा था चेहरा हमारा।
मन में उठीथी जिने की चाहत
ऐसा लगा कि जैसे संसार की
सारी खुशियाँ मुझे ही मिली।
मगर चाहा कर क्या होता है ?
जिसे चाहा वह नही मिला,
आखिर मेरी चाहत , चाहत ही रह गयी।

**विपुल कोले** बी. ए. भाग - १

## " मंदिर हमारा "

है '' दुधसाखर '' हम सबका प्यारा
सब कॉलेजों मे पढने को न्यारा
पढकर हम यहाँ से जाएँगे दूर कई
देखने को यह रंगीन दुनिया नयी
जिसको दुनिया कहे गँवारा
उसको 'दूधसाखर ' ने दिया सहारा
यहाँसे निकलेंगे शिवाजी, छत्रपती, शाहू
जिन्होने हसील की इन्सानियत बहू
शांती ही उसकी बडी शान
जिसको इंदिराने समझा महान
यहाँसे बढती है ज्ञानगंगा बडी
जिसमें सरस्वती साधना खडी
मै हूँ ज्ञाननिवास का भँवरा
यहा कॉलेज नही '' मंदिर हमारा''

**अशोक शेणवी** बी. ए. २

## आशा

सब ने मेरे गीत सुने
पर दर्द को जाना किसने ?
सबने दुनिया में बहार देखी
पर काँटो को देखा किसने ?
हँसी को मैने सब में बाँटा
पर मेरे गम को देखा किसने ?

सबको मैने उजाल दिया
पर जीवन का मेरे अंधेरा देखा किसीने ?
सबसे मैने वफा निभाई
पर मुझको वफा समझा किसीने ?
